# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | ११ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८६**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पाचवे / अंक ११ / ऑक्टोबर २००४

## *संपादकीय*

## मत द्यायचं तरी कोणाला?

महाराष्ट्रातील विधानसभेसाठी होणाऱ्या निवडणुकांच्या निमित्ताने दिसणारे जे चित्र आहे त्याचा विचार केला तर पुन्हा आपला अर्जुनच होतो. पक्षीय राजकारणाचा लोकशाही विचारात अपेक्षित असलेला आदर्श अर्थ कधी या लोकशाहीत दिसलाच नाही राजकारणात आता व्यावसायिकता आली आहे असे सांगितले जाते. व्यावसायिकता सर्वच क्षेत्रात आल्याचे बोलले जाते. शिक्षण, वृत्तपत्रकारिता, राजकारण अशा सर्वच क्षेत्रातील या 'प्रोफेशनलिझम'चा विचार कोणीच करायला तयार नाही. व्यवसाय याचा शुद्ध मराठीत अर्थ 'धंदा' असा केला तर व्यावसायिक नीतीमत्ता हा शब्द फारच अडचणीचा ठरतो व नीतीमत्ता पाळायची नाही असे ठरवले तर जे काही दिसेल ते आज पहायला मिळत आहे. त्यामुळेच आपला रथ मध्यभागी उभा राहतो.

य दिसणाऱ्या एकूण चित्राची काळी कडा आणखीनच गडद करण्याचे काम दूरदर्शन सारखे माध्यम करीत आहे. या निवडणुकांचा विषय त्यांनी कसा मांडला हे पाहिले तर भीतीच वाटते. 'महाराष्ट्रातील रणसंग्राम', 'रणधुमाळी', 'महासंग्राम', 'महाराष्ट्राचे महायुद्ध' अशी वर्णनं बातम्या देणारे लोक करतात. 'रणसंग्राम' महायुद्ध' आणि लोकशाहीत अपेक्षित असणारी निवडणुकीसारखी घटना एक का? शिवाय 'अेपिलियन पोल' नावाचा करमणुकीचा कार्यक्रम 'बातम्यांच्या' 'सिरीयल्स'मध्ये दिसत राहतो. या सर्व चित्रात दिसणारे संभाव्य नेते जे आहेत त्यांची, नावे, त्यांचे कर्तृत्व हे पाहिले की अंधार अधिकच गडद होतो. 'असंतुष्ट', 'बंडखोरी करणारे', 'निष्ठावंत', आमदारेच्छु नेते, त्यांच्या 'हाय कमांड', 'रिमोट कंट्रोल्स' हे सर्व पाहिलं की सकारात्मक सेवाभावी असं काही होईल असं वाटतच नाही. पुन्हा असं जाहीररित्या बोलायची सोय नाही. कारण पलिकडचा म्हणणार 'काय, एवढा निगेटिव्ह विचार करतोस...!' शिवाय तो असंही सांगणार, 'त्यातल्या त्यात बरा असणारा जो असेल त्याला मत द्यायचं ! कारण मत तर द्यायलाच पाहिजे, तो आपला हक्क आणि पवित्र (!) कर्तव्यही आहे. तेव्हा मतदान करच.'

हे भगवंता, दोन्ही बाजूंना 'आपलेच' नातेवाईक 'महासंग्रामासाठी' 'रणांगणात' उतरलेले आहेत. मताचा बाण (बटण) कोणावर सोडायचा...?

# सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल

## यशाचे मानकरी

१. शाळेला रोटरी क्लब तर्फे पुरस्कृत इ.स.२००३चा 'आदर्श शाळा' पुरस्कार केंद्रीय मंत्री सुमित्रा महाजन यांच्या शुभहस्ते.

२. सौ. सुलेखा लौंढे यांना ब्राह्मण सेवा संघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार.

३. सौ.उल्का कुलकर्णी यांना लायनेस क्लब – ठाणे यांचा आदर्श शिक्षक पुरस्कार.

४. प्रणव पटवर्धन (इ. ८वी) राष्ट्रपतींच्या हस्ते बालश्री पुरस्कार. चीनमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय बालकोत्सवासाठी संगीतासाठी भारताचे प्रतिनिधित्व.

५. ओंकार विचारे राज्यस्तरीय आंतरशालेय स्पर्धेत सुवर्णपदक आणि जी.व्ही. मावळणकर शूटींग चॅम्पियनशिप २००४ या स्पर्धेत ताम्रपदक.

६. मिथिला राव – जिल्हास्तरीय ॲथलेटिक स्पर्धेत सुवर्णपदक व राष्ट्रीय स्पर्धेत रजतपदक.

७. रूचा गणपुले, शर्वरी गांगल व सत्श्रीका कुलकर्णी हा गट आंतरराष्ट्रीय जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत विजेता ठरला.

८. आकृती माहिमकर – रोट्रॅक्ट क्लब ऑफ ठाणे नॉर्थ आयोजित हुन्नर २००४ स्पर्धेत चित्रकलेचे द्वितीय पारितोषिक

९. ममता प्रभु – टेबल टेनिस – भारताचे प्रतिनिधित्व

१०. अमरीश नाखवा – ॲथलेटिक – राष्ट्रीय स्तरावर सहभाग.

११. आकाश साहनी – टेबल टेनिस – महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

१२. भाग्यश्री ओक – जिल्हा बास्केटबॉल स्पर्धा – महाराष्ट्र संघात निवड.

१३. 'श्री कला' संस्था, डोंबिवली तर्फे आयोजित आंतरशालेय नाट्यस्पर्धा – एकूण ३ बक्षिसे

अ. विशेष लक्ष्यवेधी एकांकिका – 'घरट्याकडून घरट्याकडे'
ब. उत्कृष्ट लेखिका – सौ. अपर्णा भोळे
क. दिग्दर्शन – प्रमाणपत्र – सौ. प्रियंका भांगले

## सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल यांनी आयोजित केलेले अभ्यासाला पूरक ठरतील असे व अभ्यासेतर उपक्रम.

१. निलेश निमकर यांचे भूगोल मार्गदर्शन – इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी

२. सौ. शीलाताई मराठे यांचे इ. ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानेश्वरीवर भाषण

३. इ. ७वी, ८वी, ९वी च्या मुलींसाठी इंटरॲक्ट क्लब तर्फे डॉ.भडकमकर यांचे लैंगिक शिक्षणासंदर्भात व्याख्यान.

४. इ. ५वी साठी डॉ. मानसी जोशी यांचे व्याख्यान – विषय – पाण्याचे उपयोग आणि दुरूपयोग

(पान क्र.३३ वर)




**वर्ष पाचवे / अंक ११ / ऑक्टोबर २००४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक ४ था)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

### *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे जीवन व कार्य (लेखांक पहिला) | शं. बा. मठ | ३ |
| २) | महाभारतातील समस्या | माधुरी पाटील, कीर्ती शिंगोटे सुचेता जोशी, प्राची प्रधान स्वाती वैशंपायन, पल्लवी जाधव | ९ |
| ३) | डॉ. मो.दि.पराडकर यांचे आत्मकथन | डॉ. मो.दि. पराडकर | १५ |
| ४) | श्री. शरद साठे यांची मुलाखत | सौ. दीपाली हिंदळेकर | २० |
| ५) | 'संत कवयित्रींनी जोपासलेले स्त्रीत्व' | गीतेश गजानन शिंदे | २४ |
| ६) | साहित्यजगत | श्री. शरद जोशी | २९ |
| ७) | २००४ वैज्ञानिक जागृकता वर्ष | प्रा.सौ. एम्. यु. बोरकर | ३२ |
| ८) | सायन्स स्क्वेअर संशोधन' वृत्त वाढविण्याचा एक अभिनव प्रकल्प | प्रा.सौ. एम्. यु. बोरकर | ३४ |
| ९) | ''सृष्टी'' बॉटनी क्लब प्रदर्शन (३०, ३१ जुलै व १ ऑगस्ट ०४) | अमित रमेश भोईर | ३५ |
| १०) | चला चंद्रमाधवीच्या प्रदेशात | सृष्टी अंकोलेकर | ३९ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | - |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ६५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशी सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धात उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत.

आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने 'दिशा' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी/जाहिरात वा देणगीची रक्कम चेकने पाठवावी.

चेक ''**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

सदर अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी सह कळवावा.


# श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे जीवन व कार्य (लेखांक पहिला)

*ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनकार्याचा तत्कालिन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर परिचय करून देणारी लेखमाला*
*- संपादक*

**तत्कालीन परिस्थिती**

कोणत्याही काळाची सामान्य कल्पना येण्यास त्या काळचा राजकीय वाङमयात्मक व धार्मिक इतिहास पाहावा लागतो. हा काळ महाराष्ट्राच्या इतिहासात फार महत्त्वाचा आहे. जैत्रपाळ, सिंघण देव व रामदेव या सारखे राजे, भास्कराचार्य व बोपदेव या सारखे पंडित, हेमाडपंतासारखे विद्वान् मुत्सद्दी, ज्ञानेश्वर नामदेवासारखे महात्मे ज्या काळात झाले, तो काळ महाराष्ट्राच्या इतिहासात चिरस्मरणीय आहे यात शंका नाही. लक्ष्मी, सरस्वती व आत्मविद्या यांचा उत्कर्ष श्री ज्ञानेश्वरांच्या वेळी महाराष्ट्रात झाला.

श्री ज्ञानेश्वरांच्या पूर्वजांनी चार दोन पिढ्या यादव घराण्याची सेवा केली आहे आणि तसेच पंढरपूरच्या भागवत संप्रदायाचा उदयही रामदेवराव जाधव (यादव) यांच्या कारकीर्दीत व त्यांच्या सहानुभूतीनेच झालेला असून खुद्द श्री ज्ञानेश्वरांनी त्यांच्याबद्दल सप्रेम गोरवोद्गार काढलेले आहेत.



या यादवांच्या कारकीर्दीत वैद्यक, ज्योतिष व धर्मशास्त्र या विद्यांचा उत्कर्ष ज्या विद्वांनानी केला त्यांचीही माहिती बोधप्रदच ठरेल. थोडक्यात श्री ज्ञानेश्वरांचा काळ म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातले सुवर्णयुग होय.

यादवांच्या राजघराण्यातील दुसरा राजा जैतुगी तिसरा राजा सिंघण यांच्या कारकीर्दीत खुद्द श्री ज्ञानेश्वर महाराज झाले. हे देवगिरीचे यादव उर्फ जाधव राजे द्वारकाधीश श्रीकृष्ण भगवान याच्याच जगविख्यात घराण्यातील होत.

पहिला राजा भिल्लम याने देवगिरीच्या राज्याचा विस्तार करून त्याला साम्राज्य पदास पोचविले. त्याचा १८ वा पूर्वज दृढ-प्रहारी नामक राजा होऊन गेला. हा देवगिरी यादवांचा पहिला पूर्वज होय. सेऊणचंद्र राजाच्या पराक्रमाणमुळे त्यांच्या राज्याच्या प्रदेशाला (नाशका पासून देवगिरी पर्यंतच्या) सेऊणदेश असे नाव पडले. पुढे मोगल काळी यालाच खानदेश असे म्हणून लागले.

सिंधणाच्या मागून त्याचा पुत्र जैतुगी हा अल्पकाळ गादीवर आला. थोडक्याच महिन्यात मृत झाला. त्याचे पुत्र म्हणजे सिंधणाचे नातू कृष्ण व महादेव यांनी अनुक्रमे १३,११ वर्षे राज्य केले. हे दोघेही लोकप्रिय होते. कृष्णदेवाबद्दल हेमाद्रीने म्हटले आहे 'क्षीणः कालवशाम् पुनः तरुणातां धर्मोऽपि संप्रापितः।' हे अतिशय महत्वाचे आहे. त्यांनी आपल्या पवित्र आचरणाने व ग्रंथानी धर्माच्या पुनरुज्जीवनास मोठे साह्य केले व सर्वांच्या परिश्रमांनी भागवत धर्माचे मोठे तेज चढून पुढे अल्पकाळातच पंढरीच्या परिसरात श्रीज्ञानेश्वर प्रभृती महाराष्ट्र संतांनी धर्मोदयाचा मध्यन्हकाळ आणला.

**कार्मठपणा आवश्यकच**

कर्मठपणा हा कदाचित दोष असेल

पण कर्मठपणा हे महत् पाप आहे. धर्मग्लानीच्या काळी लोक कर्मनष्ट होतात व धर्मोद्धाराच्या काळी प्रारंभ कर्मात होऊन भक्ती आणि ज्ञानात त्याचा परिपाक होतो. भगवंतांनी गीतेत असेच सांगितले आहे. 'यज्ञ दान तपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् । गीता १८.५ तेव्हा. कर्मठपणा एक गुण म्हणूनच समजला पाहिजे कारण सत् कर्माचरणाचेच पर्यवसान भागवत धर्माच्या पुनरुज्जीवनात झाले.

कृष्णदेवा मागून आलेले रामदेव यांच्या काळी संस्कृत विद्येला उत्तम राजाश्रय मिळाला. भास्कराचार्य, हेमाद्री, बोपदेव, शाङर्गधर या सारखी विद्वत् रत्ने प्रगट झाली. यादव राजधानी देवगिरी ही या वेळी अपार वैभव भोगीत होती. त्रैलोक्यातील संपत्तीचे ते विश्रांती स्थान होते. तेथील मोठाले वाडे शैलशिखराशी स्पर्धा करीत होते. तेथील लोक, त्यांची भूषणे, वस्त्रे आणि बोलणे परममधुर व चित्ताकर्षक होती. रामदेवराय यांनी ३७ वर्षे राज्य केले. यांचा महाप्रधान अच्युत नायक हा शक ११९४ मध्ये साष्टी प्रातांचा महा प्रधान होता. सालुनदेव याजकडे शके ११९९-१२०२ पर्यंत मुख्य सेनापतीचा अधिकार होता. शक १२१२ मधे कृष्णदेव नावाचा यजुर्वेदी ब्राह्मण हा कोकणचा महा प्रधान होता. रामदेवरावाच्या वेळचे चोवीस लेख सांप्रत उपलब्ध आहेत. (ज्ञानेश्वर महाराज चरित्र, लेखक श्री. ल. रा. पांगारकर, यातून उद्घृत).

या काळात फारशा लढाया झाल्या नाहीत. भागवत धर्माचा उदय झाला. ज्ञानेश्वर, नामदेव संतांनी महाराष्ट्र देश भक्तिसुखात निमग्न केला. ज्ञानेश्वरीत उल्लेख करताना ग्रंथाच्या शेवटी श्री ज्ञानेश्वर म्हणतात-

ऐसी युगी परी कळी । आणि महाराष्ट्र मंडळी ।
श्री गोदावरीच्या कुळी । दक्षिण किंगी ।१८०३

त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोशक्षेत्र ।
जेथ जगाचे जीवनसूत्र । श्री महालया असे ।१८०४

तेथ यदुवंश विलास । जो सकळकळा निवास ।
न्यायाते पोषी क्षितीज । श्री रामचंद्र। १८०५

तेथ महेशान्वये संभूते । श्री निवृत्तीनाथ सुते ।
केले ज्ञानदेवे गीते । देशीकार लेणे । १८०६

गोदावरीच्या दक्षिण प्रातांत ब्रह्मांड सूत्रधार श्री महालया उर्फ महालसा, म्हाळसा अथवा मोहिनीराज नावाचे त्रिभुवनात अत्यंत पवित्र अनादि पंचक्रोश क्षेत्र आहे. यादव कुल भूषविणारा सकळ कलांचे केवळ निवास स्थान असा, व न्यायाने प्रजापालन करणारा श्री रामचंद्र राजा या देशावर राज्य करीत आहे. त्याच्याच सत्तेखाली असलेल्या महालसा क्षेत्रात (नेवासे) आदिनाथ शंकर यांच्या परंपरेला निवृत्ती नाथांचा शिष्य, जो, मी-ज्ञानदेव, त्याने गीतेच्या अंगावर प्राकृत आलंकार चढविला आहे.

## ज्ञानेश्वर पूर्वीचे विठ्ठलाचे उल्लेख

पांडुरंग कथा पद्मपुराणात आहे. श्री क्षेत्र पंढरपूर हे हजार वर्षे तरी महाक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. पंढरी विठ्ठल देवाची नगरी म्हणून दक्षिणभर गाजत आहे. ११९५चा शिलालेख.

स्वस्ति श्री शकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागिनिपुर श्री विठ्ठल देवरायासि विसासिती फुले दांडे आचंद्रार्क चालवेना नाना भक्ति मालिआ दत्त पैकाचा विवरु. (फागिनिपुर-फाल्गून पौर्णिमा फुलें व दांडें विठ्ठलाससमर्पण- अनेक भक्तांची नामावली.) रामदेव राव जाधव व त्यांचा मंत्री हेमाद्री यांचाही हातभार या कार्यास लागला आहे. पंढरपूर नगराला दक्षिण द्वारावति अशी पदवी दिली आहे.

## एखाद्या संस्थेला जिवंतपणा कोण आणतो ?

भाविक लोक व राजमंडळ एखादी संस्था काढतील व द्रव्य बळावर कांही काळ चालवतील पण त्या संस्थेस आतून जे ईश्वरी तेज लागत असते ते संतांच्या पाठबळाशिवाय प्राप्त होत नाही. कोणत्याही संस्थेस जिवंतपणा आणण्यास ईश्वरी विभूतीच लागत असतात.

भाविकांच्या अत्युत्कट प्रेमाने सगद्‌गदित होऊन पंढरीनाथाने आपल्या भक्तांना वैकुंठाहून महाराष्ट्रात आणले.

येथील भाविकांना विठ्ठल भक्तीचे रहस्य शिकवून सगुण निर्गुणाचे व भक्ति ज्ञानाचे ऐक्य, त्यानी त्यांच्या मनावर ठसविले. विठ्ठल आणि कृष्ण एकच श्रीकृष्ण मुखाने जी गीता प्रकट झाली तिचा महाराष्ट्र मंडळात प्रसार व्हावा म्हणून ज्ञानोबा माऊलीने शके १२१२ मधे भावार्थ दीपिका प्रगट केली.

### महाराजांचे पूर्वज -

हे आपेगांवचे कुलकर्णी होत. ही वृत्ती त्यांच्या घराण्यात कित्येक पिढ्या चालत आलेली होती. त्र्यंबकपंत हे ज्ञानेश्वरांचे पणजे. हे मोठे कर्तबगार व भगवद्‌भक्त म्हणून गणले गेले. गोविंदपंत व हरिपंत या नांवाची दोन भांवडे. गोविंद पंत कुलकर्णीचा व्यवसाय करीत. हरिपंत मर्दुमकी गाजवीत. हे पुंड देशमुखावर सैन्यासह चालून गेले पण युद्धात धारातीर्थी पडले. पुत्राचा झालेला नाश पाहून त्र्यंबकपंत उदास झाले. परत आपेगांवी येऊन राहिले. उतारवय तरी हरिभजनी लावावे असे त्याना वाटते. गोरक्षनाथांनी त्याजवर अनुग्रह केला. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या वंशात भगवद्‌भक्त त्र्यंबकपंत होत.

### वडील विठ्ठलपंत-

गोविंदपंत व भार्या निरूबाई यांच्या उदरी वयाच्या ५५व्या वर्षी एक पुत्र झाला. त्याचे नाव विठ्ठलपंत होय. हेच श्री ज्ञानेश्वरांचे जनक होत. निराबाई या पैठणकर कृष्णाजीपंत देवकुळे यांच्या भगिनी होत. हे घराणे अद्याप पैठणास आहे. गायत्री पुरश्चरणाने गोविंदपंतास विठ्ठलपंत झाले. असा उल्लेख पैठणकरांनी श्री ज्ञानेश्वरांना दिलेल्या शुद्धिपत्रात आहे. गोविंदपंतांना गैनीनाथ याजकडून ब्रह्मोपदेश झाला.

विठ्ठलपंत म्हणजे मूर्तिमंत वैराग्य. हे वैराग्य डोळस होते. सविवेक वैराग्य होते. विवेकयुक्त वैराग्यच कायम टिकते. ज्ञानावाचून केवळ वैराग्य आंधळे होय. विठ्ठलपंत विवेक वैराग्यशील होते. विठ्ठलाचा व्रतबंध सातव्या वर्षी झाला. अल्पकाळातच वेदशास्त्र अध्ययन पूर्ण झाले. तेव्हा तीर्थाटन करण्यास त्यानी वडीलांची आज्ञा घेतली.

शास्त्राध्ययनाला तीर्थाटनाची जोड देण्याची पद्धत प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. हरि चिंतन करीत विठ्ठलपंत तीर्थ यात्रा करू लागले. ते द्वारकेस गेले. तेथून ते पिंडारकास गेले. तेथून सुदामपुरी पाहून रुक्मिणीचा विवाह झाला ते मूळमाधव तीर्थ पाहिले. श्रीकृष्णांनी आपले अवतार कार्य संपविले त्या भालुका तीर्थास ते गेले. तेथून प्रभासला, सोरटी सोमनाथ, मुचकुंद गुंफा इत्यादी तीर्थे करीत नाशिकास सप्तशृंगीस गेले. त्र्यंबकेश्वरी जाऊन कुशावर्ती स्नान केले. गंगाद्वार, ब्रह्मगिरी प्रदक्षिणा करून विठ्ठलपंत भीमाशंकरहून अलंकापुरीस आले.

### आळंदीतील घटना-

आळंदीस विठ्ठलपंत सिद्धेश्वराच्या देवळात उतरले. आळंदीचे भगवद्‌भक्त कुलकर्णी सिधोपंत नेहमीप्रमाणे देवदर्शनास आले होते. त्यांनी सिद्धेश्वराचे दर्शन घेतले. पाराभोवती गर्दी पाहून ते तिथे आले. सतरा अठरा वर्षाचा बालयोगी ध्यानस्थ बसला होता. त्याला पाहताच सिधोपंत त्याच्या कडे खेचले गेले. सिधोपंताना या बालयोग्या बद्दल कमालीची आत्मीयता वाटू लागली. सिधोपंतांनी त्याची चौकशी केली व घरी राहण्यास बोलाविले.

विठ्ठलपंत त्यांच्या घरी गेले. सिधोपंतांनी विठ्ठलपंतांची बडदास्त राखली व सन्मानाने वागविले. विठ्ठलपंत पुढे यात्रेला निघण्याच्या तयारीत होते. त्या पहाटे सिधोपंतांना देवाचा दृष्टांत झाला. तू आपली कन्या रुक्मिणी विठ्ठलपंतांस दे. तिच्या उदरी तेजस्वी मुले जन्मला येतील. सिधोपंतांनी पत्नीशी विचार करून विठ्ठलपंतांना स्वप्न सांगितले. विठ्ठलपंतांनी आश्चर्य व्यक्त केले. लग्नाचा

विचार त्यांना रुचला नाही. सिधोपंतांनी आग्रह केल्यावरून आणखी तीन दिवस मुक्काम वाढविला. तिसरे दिवशी पहाटे विठ्ठलपंतांना दृष्टांत झाला - तू सिधोपंतांच्या मुलीचा स्वीकार कर. ही गोष्ट त्यांनी सिधोपंतांना सांगितली.

मोठ्या थाटात सिधोपंतानी रुक्मिणी विठ्ठलपंतांचा विवाह उरकून टाकला. विठ्ठलपंत नको असलेल्या बंधनात पडले. विवाहानंतर सर्व मंडळी पंढरपुरास गेली व दर्शन घेऊन आळंदीस परतली. सिधोपंतांची आज्ञा घेऊन विठ्ठलपंत दक्षिण यात्रेस निघाले. ते कृष्णा, कावेरी, तुंगभद्रा इथे स्नाने करून श्री शैलम, वेंकटाद्री, रामेश्वर, शिवकांची, विष्णुकांची, गोकर्ण, हाटकेश्वर, कोल्हापूर, कराड, माहुली इत्यादी क्षेत्रे करून परत आळंदीस आले.

विठ्ठलपंतांना आपेगांव सोडून बरेच दिवस झाले होते. आपल्या मातापित्यांना भेटणे आवश्यक होते. त्यांच्या बरोबर नूतन पत्नीही जाणार होती. सिधोपंत जावयाल पोचविण्यासाठी गेले. सर्व जण आपेगांवला आले. उत्तम सून मिळाली म्हणून विठ्ठलपंतांचे आईवडील संतुष्ट झाले.

काही दिवस सुखात गेले. विठ्ठलपंतांचे संसारात लक्ष. नव्हते. ते नेहमी ईश्वरचिंतनात मग्न असत. त्यांच्या दृष्टीने ऐहिक सुखात काही अर्थ नाही असे वाटे. थोड्याच दिवसाच अंतराने अचानकपणे विठ्ठलपंतांचे आईवडील निवर्तले. संसाराची संपूर्ण जबाबदारी विठ्ठलपंतांवर पडली. त्यांची विरक्ती आणखी वाढली. पत्नीचे हाल होऊ लागले. सिधोपंत लेकीला व जावयाला घेऊन आळंदीस आले. विठ्ठलपंतांना संन्यास घेण्याची इच्छा झाली.

### संन्यास दीक्षा

विठ्ठलपंत जन्मतःच वैराग्यशील. त्यांनी पत्नी मागे संन्यास घेण्याची परवानगी देण्याचा सतत पाठपुरावा केला. एकदा वैतागून तिने म्हटले, 'जा संन्यास घ्या' पडत्या फळाची आज्ञा विठ्ठलपंतांनी काशी गाठली. रामानंदांचे वास्तव्य काशीत होते. आपल्याला संन्यास दीक्षा देण्याबद्दल विठ्ठलपंतांनी विनंती केली. बरेच दिवस विठ्ठलपंत काशीत होते हे रामानंदांनी पाहिले. त्यांच्या ठिकाणची परमेश्वर प्राप्तीची तळमळ स्वामींना माहीत झाली. अशा वैराग्य संप विठ्ठलपंतांना रामानंदांनी दीक्षा दिली व त्यांचे नाव चैतन्याश्रम ठेविले. रामानंदांचा शिष्य परिवार मोठा होता. कबीर हे रामानंदांचे शिष्य होते. अनेक वर्षाचे ईप्सित प्राप्त झाल्याने विठ्ठलपंतांना आनंद झाला. ते आपल्या स्वतेजाने चमकू लागले. रामानंदांच्या पट्ट शिष्यापैकी एक झाले.

### आळंदी घटना

इकडे आळंदीला रुक्मिणी बाईंची अवस्था सोचनीय झाली. सासू सासरे केव्हाच गेले होते. विठ्ठलपंतांचा तपास चालू होता. पत्ता लागेना. त्यांना एके दिवशी समजले काशीस विठ्ठलपंतांनी संन्यास घेतला. हे कळताच त्या साध्वीचे सर्व मनोरथ भंग पावले. त्यात अपत्यहीनता. त्यांना अपरंपार दुःख झाले. आपल्या गोड वागण्याने आळंदीतल्या लोकाना तिच्या बद्दल चुटपुट लागून राहिली.

एक दिवस त्या साध्वीने मारुतीच्या देवळात उतरलेले एक संन्यासी पाहिले. मारुतीचे दर्शन घेतल्यानंतर तिने हे कोणी महात्मे असावेत असे समजून त्याना नमस्कार केला. त्यानी पुत्रवतीभव असा आशीर्वाद दिला. हा आशीर्वाद एकेताच रुक्मिणीबाईंना हसू आले. स्वामींनी त्यांच्या हसूचे कारण कळाले. ते विचारात पडले. आपल्याकडे आलेला चैतन्याश्रम हा तर या साध्वीचा पती नाही ना अशी शंका आली. स्वामी तिच्या घरी गेले. सिधोपंतासह रुक्मिणीबाई स्वामी बरोबर काशीला आल्या. स्वामी लवकर काशीस परतले हे पाहून चैतन्याश्रमाला अत्यंत आश्चर्य वाटले. स्वामींनी सिधोपंत व रुक्मिणीबाई यांची सोय एका ब्राह्मणाकडे केली.

स्वामी म्हणाले रामेश्वरला न जाताच मी आळंदीहून

परतलो. आळंदीचे नांव ऐकताच चैतन्याश्रम चपापला. चैतन्याश्रमानी स्वामींची क्षमा मागितली. स्वामी आपणाला सर्व गोष्टी ज्ञान झाल्या आहेत. आपण दयावंत होऊन मला क्षमा करावी. स्वामी ध्यानस्थ बसले. त्याना कळले की चैतन्याश्रम व त्याची सुशील पत्नी यांच्या जीवनात काहीतरी दिव्यत्व आहे. यांना परत संसारात टाकले पाहिजे. त्यांनी शास्त्रधारेचे भय न बाळगता त्या उभयताना संसार करायला सांगणे हे युक्त. त्यानी सर्वांना एकत्र जमविले. व चैतन्याश्रमाला सांगितले 'तू आपल्या स्त्रीचा स्वीकार कर.' तू मला फसवून घेतलेल्या चतुर्थाश्रमाची दीक्षा रद्द झाली आहे. तू आपल्या स्त्रीसह आचार धर्माने परमेश्वरावर निष्ठा ठेवून शास्त्रा विरुद्ध असले तरी संसार ऋण फेड. माझा आशीर्वाद तुझ्या मागे आहे. तू पुनः संसार करावास अशीच त्या जगनियंत्या परमेश्वराची इच्छा आहे.

**पुनः गृहस्थाश्रम**

विठ्ठलपंत आळंदीस येऊन पुनः आपल्या कुटुंबासह राहिले. तेथे एक नवीनच प्रश्न उपस्थित झाला. संन्यानी झाल्यावर पुनः गृहस्थाश्रम घेतला म्हणून आळंदीच्या ब्रह्म वृंदांनी त्याला वाळीत टाकले. केवळ भिक्षेवर विठ्ठलपंतांनी कुटुंबाचे रक्षण करावे लागे. आचार विचारांनी शुद्ध राहून रात्रंदिवस गीता, भागवत, इत्यादी धर्म ग्रंथांचे वाचन आणि मनन त्यांनी चालू ठेविले. भगवंतावरील दृढत्तम श्रद्धेने चित्तामध्ये अखंड समाधान पाहून त्यांचा काळ पुढे जात होता.

केवळ गुरु आज्ञा म्हणून त्यानी गृहस्थाश्रम पत्करला. संन्यास घेतल्यानंतर परत गृहस्थाश्रम शास्त्र संमत नसल्याने लोकांनी विठ्ठलपंतांचा छळ केला. त्यामुळे लोकांना दोष देता येत नाही. विठ्ठलपंत विषयलंपटामुळे गृहस्थाश्रमी बनले नव्हते यात त्यांचाही दोष नाही. खोटे बोलून संन्यास घेतल्याबद्दल रामानंदांनी परत गृहस्थाश्रम स्वीकारावयास सांगितले यात त्यांचाही दोष नाही. हे नियतीला असेच घडवावयाचे होते ते घडले.

अशी बारा वर्षे निघून गेली. शके ११९५ श्रीमुख संवत्सर माघ व प्रतिपदा या दिवशी प्रातःकाली त्यांना पहिला मुलगा झाला. त्याचे नाव निवृत्ती नाथ. पुढे दोन वर्षांनी शके ११९७ युवा नाम संवत्सरी श्रवाण वद्य अष्टमीस मध्यरात्री अगदी कृष्ण जन्मावेळी श्री ज्ञानेश्वरांचा जन्म झाला. शके ११९९ ईश्वर नाम संवत्सरी कार्तिक शुद्ध पौर्णिमा एक प्रहर रात्री सोपानदेवांचा जन्म झाला आणि शके १२०१ प्रमाथि नाव संवत्सरी आश्विन शुद्ध प्रतिपदा या दिवशी मध्यान्ही मुक्ता बाईंचा जन्म झाला. चारही बालके म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचे अंशच जन्माला आले होते.

ही चारही भावंडे आपल्या मात्यापित्यासह अत्यंत कष्ट प्रद अवस्थेत राहत होती. वाळीत टाकल्याने निंदा, कुत्सित बोलणी सहन करावे लागे. विठ्ठलरुक्मिणी या जोडप्याने अत्यंत धीराने हे सर्व सहन केले. या चार मुलांकडे पाहून आपला प्रपंच त्यांनी चालवला होता. आपल्या आईवडीलांची जाज्वल भक्ती, उपासना, ज्ञान, वैराग्य आणि सहनशीलता यांचा त्यांच्या मनावर खोल असा ठसा उमटला होता. आई वडिलांप्रमाणे ही मुले देवाचे नामःस्मरण व इतर उपासना करीत.

मुले मोठी होऊ लागली तशी एक नवीन चिंता आईवडिलांना उत्पन्न झाली. मुलांच्या सर्व आयुष्याची भीषणता त्यांच्या ध्यानात आली. या मुलांचे पुढे कसे होणार? त्यांचे समाजात स्थान काय ? आपल्या पश्चात त्यांना आपुलकीने कोण बरे सांभाळील ? दिवसे दिवस या चिंतेचे स्वरुप उग्र होत गेले. दयाधन परमेश्वर आपल्याला मार्ग दाखवील. निवृत्तीनाथ सात वर्षाचे झाले. तेव्हा त्याचा व्रतबंध कसा होईल? ही विठ्ठलपंतांना काळजी उत्पन्न झाली. विठ्ठलपंतांनी खूप खटपट केली पण व्यर्थ. रुक्मिणीबाईंच्या मना प्रमाणे काही अनुष्ठान करावे हा हेतू

मनात धरून विठ्ठलपंतांनी स्त्रीपुत्रासह त्र्यंबकेश्वरास प्रयाण केले.

तेथे मध्यरात्री कुशावर्तात स्नान करावे मुलासह ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घालाव्यात. एके रात्री प्रदक्षिणेस बाहेर पडले असताना त्यांच्या समोरून एक विक्राळ व्याघ्र उड्या घेत चाललेला पाहिला. विठ्ठलपंत घाबरुन गेले. मुले सांभाळण्यात गुंतले. तोच निवृत्तीनाथ वाट चुकले व भलती कडच्या वाटेने पळत सुटले. ते पळत पळत अंजनी पर्वताच्या एका गुहेत शिरले तिथे गहिनीनाथ होते. निवृत्तीनाथानी त्यांच्या पायावर लोटांगण घातले. त्या कोमल वयाच्या मुलाकडे पाहून गहिनीनाथांना समाधान झाले. हा अधिकारी संपन्न शिष्य आहे असे त्यांना वाटले. व त्यानी त्यास ब्रह्मोपदेश केला. योगमार्गाने दीक्षा दिली. श्रीकृष्णाची उपासना दिली व नामस्मरणाचा प्रसार करण्याची आज्ञा केली. काही दिवसांनी निवृत्ती नाथ येताना पाहताच धाकटी भावंडे आनंदली. निवृत्तीने आपली सारी हकीकत आईवडिलांना सांगितली.

अनुष्ठान संपवून सहा महिन्यानी सर्व मंडळी पुनः आळंदीस परतली. ब्राह्मण समाजाने मुलाना ब्राह्मण वर्णात स्वीकारल्यास एक चिंता कमी होईल म्हणून विठ्ठलपंतांनी आळंदीच्या ब्राह्मणवृंदाना विचारणा केली. हे भूदेवांनो गेली वीस वर्षे आमच्यावर बहिष्कार आहे. झाली एवढी शिक्षा पुरे म्हणून आम्हाला पावन करून घ्या. आपण जे काही दंड कराल तोही भोगायला मी तयार आहे असे म्हणून विनम्र अभिवादन केले. माझ्या मुलांच्या मुंजी होतील असा शास्त्राधार शोधून त्यांच्या मुंजी लावून द्याव्या म्हणजे एका ब्राह्मण कुळाचा उद्धार होईल. (क्रमशः)

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे ४०० ६०२.

●●●

**परिसर वार्ता**

## विद्या प्रसारक, मंडळ ठाणेचा दीक्षांत समारंभ

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे संचालित संस्थांमधील पदविका प्राप्त विद्यार्थ्यांचा दिक्षांत समारंभ ५ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. आयआयटीचे डॉ. दीपक फाटक यांच्या हस्ते पदविका प्राप्त विद्यार्थ्यांना पदविका देण्यात आल्या. याप्रसंगी विद्यापीठाच्या धर्तीवर सर्व समारंभ झाला.




व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष श्री.वि.करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, कला व वाणिज्य महाविद्यालयाचे आणि व्यवस्थापन विभागाचे प्राचार्य स.वा.गोखले, प्रगत अध्यापक केंद्राचे संचालक डॉ.गो.वि. कुलकर्णी व्यासपीठावर पगडी धारण करून स्थानापन्न होते. विद्याप्रसारक मंडळाच्या प्रगत अध्यापन केंद्रातून आणि व्यवस्थापन अभ्यासक्रम केंद्रातून पदविका प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना या पदविका देण्यात आल्या. प्रेक्षकांमध्ये आमदार अनंत तरे, ठाणे महानगरपालिका स्थायी समिती सभापती प्रकाश नरसाणा, सभागृह नेते एकनाथ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# महाभारतातील समस्या

*महाभारत हा ग्रंथ कृष्णद्वैपायन व्यासांनी लिहिला. आजदेखील महाभारत हा एक अत्युकृष्ट ग्रंथ मानला जातो. त्यात राजनीती, तत्त्वज्ञान, तत्कालीन अध्यात्मिक प्रगती, आचार, शिक्षण, चालीरीती याचे प्रतिबिंब पडलेले आढळते. किंबहुना त्यातून त्याकाळच्या परिस्थितीचे बहुतांश चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. या महाभारतातील समस्या फार गहन आहेत. त्यातील काही समस्यांचा विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींनी फाऊंडेशन कोर्सच्या प्रोजेक्टच्या निमित्ताने केलेला हा विचार. - संपादक*

**अमरत्व म्हणजे काय ?**

अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमान, विभिषण, कृपाचार्य व परशुराम हे सात पुरुष चिरंजीव आहेत. अजूनही जगाच्या पाठीवर कोठेतरी त्यांचे वास्तव्य आहे अशी श्रद्धाळू लोकांची समजूत आहे. खरेतर ही समजूत अतिशय खुळचटपणाची आहे. जगातला कोणताही प्राणी अमर असू शकत नाही. जन्माला येणारा केव्हा ना केव्हातरी मरणारच हा सृष्टीचा नियम आहे. राम व कृष्ण ज्यांना लोक देव मानतात अशा थोर महापुरुषांनाही मरण चुकले नाही तेथे इतरांची कथा ती काय? येथे कुणाची तुलना करण्याचा उद्देश नाही तर श्रीराम व श्रीकृष्ण हे देवाचे अवतार मानले जातात. मग जेथे देवाला मरण चुकले नाही तेथे त्याचे शिष्यगण म्हणून ओळखले जाणारे हनुमान, विभिषण आदींना ते कसे बरे चुकेल?

बेपत्ता झालेल्या माणसाच्या मरणाची निश्चित बातमी जोपर्यंत कानी येत नाही तोपर्यंत तो जिवंत आहे हे मानणे सोयीचे असते. परंपरागत श्रद्धेने या सात व्यक्तींच्या भोवती दिव्यत्वाचे वलय निर्माण केले असल्यामुळे या व्यक्ती चिरंजीव आहेत असे मानले जाते. व्यासांच्या काळी १०० पासून १४० वर्षांपर्यंत माणसे जगत असत. व्यासांनी कौरव-पांडवांच्या सहा पिढ्या पाहिल्या आणि भारतीय युद्ध संपल्यानंतर त्यांनी भरतकुळाचा इतिहास लिहून काढला. दीर्घायुषी व्यास मृत्यूच्या वेळी १४० वर्षांचे असणे त्या काळातील आयुर्मानाप्रमाणे शक्य आहे. व्यासाचा देह मरणाधीन होता. पण त्यांनी केलेले कार्य मात्र अमर आहे. इसवी सनापूर्वी ३००० वर्षांइतक्या प्राचीन काळी त्यांनी लिहिलेला भारतीय समाजाचा इतिहास आज 'महाभारत' या नावाने आपल्या हाती आहे. या सर्वश्रेष्ठ ऐतिहासिक महाकाव्याच्या रूपाने महर्षी कृष्णद्वैपायन व्यास आजही जिवंत आहेत.

**गांधारी**

गांधारी ही एक धर्मशील पतिव्रता म्हणून महाभारतात प्रसिद्ध आहे. जन्मांधाशी विवाह होणार असल्याने तिने विवाहासाठी हस्तिनापुरास निघण्यापूर्वी कापडाच्या पट्टीने आपले डोळे बांधून टाकले आणि जे एकदा डोळे झाकून टाकले ते आयुष्यभर कधीच सोडले नाही, असे महाभारतकार सांगतात. जन्मांध पुरुषाच्या पत्नीविषयी लोकापवाद पसरण्याचा संभव असतो तो संभव टाळण्यासाठी गांधारीने हे कृत्रिम अंधत्व स्वत:वर लादून घेतले असावे. पती आंधळा असेल तर पत्नीने आपल्या डोळ्यांचा उपयोग करू नये ही पातिव्रत्याची अतिरेकी कल्पना आहे. त्याकाळी समाजात पतीव्रताधर्माचे महत्त्व वाढत असल्यामुळे कृत्रिम अंधत्व स्वीकारून आपले पातिव्रत्य निरपवाद करणे गांधारीला इष्ट वाटले असावे किंवा आपला नियोजित वर जन्मांध आहे हे समजल्यावर तिने डोळ्यांवर पट्टी बांधून घेतली होती. यावरून पतीचे अंधत्व

उघड्या डोळ्यांनी पाहण्याच्या यातना भोगाव्या लागू नयेत म्हणूनही गांधारीने आपले डोळे झाकून घेतले असावे. म्हणूनही गांधारीने आपले डोळे झाकून घेतले असावे. ते काहीही असले तरी त्या काळच्या समाजात पतिव्रता म्हणून ती मान्यता पावली होती. गांधारीला शंभर मुले व एक मुलगी होती. दरवर्षी एक मुलगा असा सरळ अर्थ लावला तर सतत एकशेएक वर्षे गांधारीला मुले होत होती असे मानावे लागेल. त्याकाळी आजच्यापेक्षा आयुर्मान अधिक होते हे मानले तरी एका स्त्रीला सतत एकशे एक वर्षे गर्भसंभव होणे शक्य नाही. यापैकी काही मुले जुळी असतील असे धरले तरी हिशोब जुळत नाही. पण महाभारतातील कथेप्रमाणे या सर्वांचा जन्म एकाच वेळी काही तासांच्या फरकाने झालेला होता. प्राणिशास्त्राच्या इतिहासात कोणत्याही प्राण्याच्या मादीला एकाचवेळी एकशेएक पिल्लं झाल्याचे आपण ऐकलेले नाही. मानवाच्या इतिहासात एखाद्या स्त्रीला एकाच गर्भसंभवात सात मुले झाल्याची नोंद आहे. पण १०१ मुले झाल्याचे ऐकलेले नाही. महाभारताप्रमाणे गांधारीला शंभर पुत्र व एक मुलगी एकाच वेळी झाले होते. त्याची कथा अशी -

गांधारीने शंकराची आराधना करून शंभर पुत्र होण्याचे वरदान मिळविले होते. त्यानंतर एकदा कृष्णद्वैपायन व्यास महर्षी दमून भागून व भुकेने व्याकूळ होते, तेव्हा ते गांधारीकडे आले असता तिने त्यांची सेवा करून व त्यांना भोजन देऊन प्रसन्न कले. व्यासांनी जेव्हा तिला वर मागण्यास सांगितले तेव्हा, 'मला माझ्या पतीसारखे शंभर पुत्र हवेत' असा वर तिने मागून घेतला आणि व्यासांनी प्रसन्न मनाने तो वर तिला दिला. पुढे काही काळ लोटल्यानंतर गांधारी गर्भवती झाली. पण दोन वर्षे झाली तरी प्रसूत होईना. त्यावेळी गांधारीचा धाकटा दीर पांडू हा कुंतीसह हिमालयाच्या रानात राहत होता. तेथे कुंती प्रसूत होऊन तिला एक तेजस्वी पुत्र (युधिष्ठिर) झाल्याची बातमी जेव्हा गांधारीच्या कानी आली तेव्हा ती अत्यंत अस्वस्थ झाली. आपल्या जावेला पुत्ररत्न झाले आणि आपल्या पोटातील गर्भ मात्र दोन वर्षे कोणतीही हालचाल न करता स्थिर राहिला आहे. ही कल्पना तिला असह्य झाली. तिला खूप दु:ख झाले व त्या दु:खाच्या भरात तिने प्रसूतीच्या आशेने आपले पोट बडवून घेतले. परंतु या अविचाराचा परिणाम भलताच झाला. गर्भाशयातून मूल बाहेर येण्याऐवजी एक कडक मासाचा गोळा बाहेर आला. व्यास महर्षींना ही बातमी समजताच ते धावत आले. गांधारीने घडलेली सर्व हकिकत त्यांना सांगितली. ते ऐकून त्यांचे मन कळवळले व त्यांनी तिला सांगितले की माझा वर खोटा कसा ठरेल आणि नंतर त्यांनी त्या मासाच्या गोळ्यावर थंड पाण्याचा अभिषेक करविला. तेव्हा तो गोळा उकलला आणि त्याचे एकाच मापाचे अंगठ्याच्या पेराएवढे वेगवेगळे एकशेएक भाग झाले. नंतर व्यासांनी तुपाने भरलेले एकशेएक घडे आणविले आणि प्रत्येक घड्यात एक एक भाग ठेवून दिला. त्यानंतर ज्या क्रमाने त्या घड्यामध्ये गर्भाचे भाग ठेवले गेले होते त्याच क्रमाने त्यातून बालके निर्माण होऊ लागली. तसेच पहिल्या घड्यातील गर्भभागातून गांधारीचा पहिला मुलगा दुर्योधन निर्माण झाला. त्यानंतर क्रमाक्रमाने उरलेल्या शंभर घड्यांपैकी नव्याण्णव घड्यांतून आणखी नव्व्याण्णव मुलगे निर्माण झाले व एकशेएकाव्या घड्यातून दु:शलेचा जन्म झाला.

जगाच्या कोणत्याही भागात, कोणत्याही काळात, कोणत्याही सुईणीने किंवा कोणत्याही प्रसूती तज्ज्ञाने अशी बाळंतीण बघितलेली नाही, ही कल्पना अत्यंत अचाट व अफाट आहे. पण महाभारतकारांना अशी कल्पित कथा रचण्याची आवश्यकता का वाटली असावी याचा आपण तर्क लावू शकतो. आपल्याला यात एक गोष्ट नीट लक्षात येते की गांधारी जरी एकनिष्ठ होती, पतिव्रता होती तरी धृतराष्ट्र हा काही तिच्याशी एकनिष्ठ रहाणारा पती नव्हता. गांधारी ज्यावर्षी अपत्यांचे पोषण करीत होती. त्यावर्षी तिला धृतराष्ट्राची सेवा करण्यास वेळ मिळत नसे. म्हणून

तेवढ्या काळापुरती वैश्य जातीची एक तरुणी धृतराष्ट्राच्या परिचर्येसाठी ठेवली होती. धृतराष्ट्राने त्या वैश्यकन्येकडून आपली सर्व प्रकारची 'सेवा' करून घेतली आणि त्या संबंधापासून तिच्या पोटी जो मुलगा जन्माला आला तो 'युयुत्सू' या नावाने महाभारतात प्रसिद्ध आहे. धृतराष्ट्राच्या इतर राण्यांचा किंवा रखेल्यांचा उल्लेख महाभारतात नाही. महाभारताच्या कथेच्या दृष्टीने त्यांना काही महत्त्व नसावे म्हणून त्यांचा उल्लेख महाभारतात नसावा पण धृतराष्ट्रासारख्या विलासी व सर्वसत्ताधीश राजाला गांधारीशिवाय आणखीही राण्या व रखेल्या असतील. त्यापैकी काही हीन कुळातील असतील. धृतराष्ट्राच्या एकशेएक अपत्यांपैकी काही अपत्ये गांधारीच्या पोटी जन्मलेली असतील किंवा रखेल्यांच्या पोटीही जन्मलेली असतील हे संभव आहे. पण त्या एकशेएक अपत्यांपैकी कोणालाही अनौरसपणाचा किंवा हिन कुळाचा डाग लागू नये म्हणून महर्षी व्यासांनी त्या एकशेएक अपत्यांच्या भवितव्याचा विचार करून त्याचे जन्मरहस्य कलंकित होऊ नये यासाठी त्यांनी ही कथा लोकांना सांगितली असावी म्हणजे धृतराष्ट्राच्या एकशेएक अपत्यांपैकी काहींचे जन्मरहस्य अज्ञात तरी असावे किंवा कोणत्या तरी कारणाने ते जन्मरहस्य लपविण्याची शक्यता असावी. हे अज्ञान झाकण्यासाठी किंवा गुप्तता सांभाळण्यासाठी ही सगळी एकशेएक अपत्ये गांधारीच्या पोटी जन्माला आली असे महाभारतकार सांगतात. पण एवढी सगळी मुले एकाच स्त्रीच्या पोटी जन्माला आली असे संशयास्पद विधान गैरसोयीचे वाटले असल्यामुळे महाभारतकारांनी ही अद्‌भुत जन्मकथा रचली असावी.

**कुंती व कर्ण**

कुंतीला कर्ण हा लग्नापूर्वी झाला होता त्याची कथा अशी -

शूरसेनाचा आतेभाऊ कुंतीभोज याने कुंतीला आपली मुलगी मानून तिचा सांभाळ केला होता. कुंतीभोज राजाने तिला आपल्या घरी ब्राह्मणांचा व इतर अतिथींचा सत्कार करण्याचे काम नेमून दिले होते. ते काम तिच्या आवडीचे होते व ती ते मोठ्या श्रद्धेने करीत असे. एकेदिवशी कुंतीभोजाच्या घरी दुर्वास ऋषी आले. ते मोठे तपस्वी होते. अत्यंत रागीट स्वभावाचे होते. त्यांची मिजास सांभाळणे म्हणजे तारेवरची कसरत होती. पण गोड स्वभावाच्या कुंतीने त्यांना कायम प्रसन्न ठेवले व ते तिच्यावर खूषही झाले. त्यांनी तिला वर द्यावयाचे ठरविले. ते त्रिकालज्ञ होते. कुंतीच्या लग्नानंतर तिच्या पतीचा वंश खुटेल हे भविष्य त्यांना समजले. तेव्हा त्या संकटकाळी तिला नियोगविधीने प्रजोत्पादन करून घेता यावे या हेतूने एक वशीकरण मंत्र दिला. मंत्राची दीक्षा देताच त्यांनी कुंतीला सांगितले की या मंत्रानं तू ज्या देवाला आवाहन करशील तो तुझ्याजवळ येईल अन् त्याच्यापासून तुला मुलगा होईल. दुर्वास ऋषी निघून गेल्यानंतर कुंतीला होऊ नये ती बुद्धी झाली व दुर्वासांनी दिलेल्या मंत्रात खरोखरीच काय सामर्थ्य आहे, याची परीक्षा पाहण्याचे विचार तिच्या मनात घोळू लागले. समोर सूर्यबिंब पाहून तिने सूर्यालाच आवाहन करण्याचे ठरविले व तिने वशीकरण मंत्राचा जप करून सूर्याला आवाहनदेखील केले. त्याचबरोबर प्रत्यक्ष सूर्य पुरुषाच्या रूपाने तिच्या तोंडचे पाणीच पळाले. ती हात जोडून, थरथर कापत सूर्याला म्हणाली, 'हे सूर्यदेवा, मला क्षमा करा. दुर्वासांच्या मंत्राची परीक्षा पाहण्यासाठी मी हा सर्व प्रकार केला. हा माझा अपराध पोटात घाला आणि तुम्ही आलात तसे परत जा.' पण सूर्याला असला पोरखेळ आवडला नाही. तू मला आपण होऊन बोलावले आहेस अन् तुझ्या बोलण्यावरून मी आलो आहे आता तू माझ्याशी समागम केलाच पाहिजेस असे सूर्य कुंतीला म्हणाला. तसेच तू समागमाला तयार झाली नाहीस तर मी तुला, तुझ्या बापाला व हा मंत्र देणाऱ्या दुर्वासऋषींनाही जाळून टाकीन अशी धमकीही त्याने कुंतीला दिली. कुंतीची अवस्था अगदी

केविलवाणी झाली होती. ती सूर्याला पुन्हा विनवून सांगू लागली की असे कृत्य केल्याने माझे कौमार्य भ्रष्ट होईल, मला लोक नावे ठेवतील. तेव्हा तुम्ही मला क्षमा करा व परत जा. पण सूर्य परत जाण्यास तयार नव्हता. तेव्हा तुझे कौमार्य भ्रष्ट होणार नाही. तुला माझ्यापासून पुत्र होईल आणि तुझे कौमार्य परत पहिल्यासारखे होईल तेव्हा तू चिंता सोड असे सांगून सूर्याने तिची समजूत काढली. आता आपल्यासमोर काही इलाज नाही असे पाहून कुंतीने सूर्याकडून काही अटी कबूल करून घेतल्या. होणारा मुलगा रूपवान, बलवान, धर्मशील असावा आणि त्याच्या अंगावर जन्मत:च दिव्य कवच व कानात दिव्य कुंडले असावीत व त्यामुळे तो युद्धात अवैध्य व्हावा - सूर्याने या सर्व अटी कबूल केल्या व या संबंधानंतर कुंतीला गर्भ राहून तिला कर्ण झाला. त्याच्या अंगावर कवच कुंडले होती. पण लोकापवादाच्या भीतीने तिने त्याला नदीत सोडून दिले. पुढे पांडूपासून आपल्याला मुले होणार नाहीत असे जेव्हा तिला समजले तेव्हा पांडूच्या संमतीने तिने यम, धर्म, इंद्र, वायू यांना आवाहन करून त्यांच्यापासून पुत्रोत्पत्ती करून घेतली व माद्रीनेही हा मंत्र घेऊन अश्विनीकुमारांना आवाहन करून दोन मुलांना जन्म दिला.

यात प्रथमच खटकणारी गोष्ट म्हणजे दुर्वासऋषींनी जो वशीकरण मंत्र कुंतीला दिला होता तो देताना त्यांनी काही विचार कसा केला नाही. आपण एका अजाण, निरागस मुलीला कोणता मंत्र देत आहोत व त्याचे परिणाम काय होऊ शकतात याची कल्पना त्यांच्यासारखे थोर ऋषी करू शकत नव्हते काय? ऋषींचा मंत्र फुकट जाऊ नये म्हणून कुंतीला तयार करणाऱ्या तथाकथित सूर्याने सुद्धा काहीच विचार कसा केला नाही? ऋषींचा मंत्र, सूर्याचे येणे-जाणे महत्त्वाचे होते की त्या अजाण मुलीचे आयुष्य महत्त्वाचे होते. सूर्याने तर स्वत:चे काम उरकले व कुंतीही कौमार्यापासून भ्रष्ट झाली नाही पण त्या कर्णाचे काय? त्याचे आयुष्य तर उद्ध्वस्त झाले होते. त्याला आयुष्यभर आपले खरे मातापिता कोण याचीच चिंता लागली होती व त्यामुळे त्याच्या मनात न्यूनगंड निर्माण झाले. त्या शूर, पराक्रमी, दानशूर माणसाचे आयुष्यच दिशाहिन झाले होते. या सर्वाला तथाकथित व कुंतीबरोबरच दुर्वासही जबाबदार नव्हेत काय? यात आणखी एक खटकणारी गोष्ट म्हणजे कुंतीचे कर्णासह चार मुलगे व माद्रीचे दोन मुलगे या सहा जणांचे जन्मदाते सूर्य, यम, वायू, इंद्र आणि अश्विनीकुमार हे सहा देव होते, असे महाभारतकार सांगतात. या सहाजणात सूर्य व इंद्र हे आपणास चांगलेच माहीत आहेत. सूर्य प्रकाशात जीवनसत्त्वे असतात, सूर्यप्रकाशामुळे रोग बरे होतात, आपल्याला चांगले आरोग्य लाभते, हे आपणास माहित आहे. सौरशक्तीचे विधायक आणि विध्वंसक असे दोन्हीही उपयोग होऊ शकतात हे ही आपणास ठाऊक आहे पण सूर्य स्त्रीसमागम करू शकतो आणि त्याच्या बीजाने स्त्रीला गर्भ राहू शकतो हे मात्र माहीत नव्हते. सूर्य हा निर्जीव जड पदार्थांचा गोळा आहे. हा निर्जीव पदार्थ सजीव पुरुषाचे कार्य कसे करू शकेल? दुसरे गृहस्थ म्हणजे इंद्र. पुराणातल्या कथांवरून आपणांसमोर त्याचे रंगेल, भित्रे व पोरकट असे चित्र उभे राहते. कोणी प्रखर तप करायला सुरुवात केली की यांचे इंद्रपद जाईल म्हणून ते त्या तपस्व्याची तपस्या भंग करण्यासाठी अप्सरा पाठवायचे. अहिल्येशी कपट करणारा इंद्र देवाचा राजा कसा काय आहे हीच प्रथम चिकित्सा करण्याजोगी गोष्ट आहे. तसेच यमधर्म म्हणजे यम याला आपण फक्त एकदाच बघतो तेसुद्धा मरताना. जगातील लोकसंख्या कमी करणारे हे यम लोकसंख्या वाढवण्याचे सुद्धा काम करतात का हे माहीत नव्हते.

देव म्हणजे देवपण लाभलेली माणसेच. त्यांना आपण आदर्श मानावे असे सर्व म्हणतात. जर देवांनीच नीतिमूल्ये पाळली नाहीत तर सामान्य माणसे ती कशी पाळणार? पण खरेतर ही सहा पुत्र देवांची नसावी असे वाटते. कुंती कुमारीमाता झाली पण ज्या पुरुषापासून तिला

कर्ण झाला तो सूर्यासारखाच तेजस्वी वगैरे असेल परंतु त्याचे नाव गाव तिला माहित नसावे किंवा माहित असूनही ते सांगण्याची तिची इच्छा नसावी म्हणून तिने सूर्याचे नाव सांगितले असावे.

नियोगविधी हा त्याकाळी शिष्टसंमत होता हे आम्ही पहिल्या प्रकरणात स्पष्ट केलेच आहे. नियोगविधीने पांडवांचा जन्म झाला हे खरे पण त्याचे जन्मदाते मनुष्यच होते. ते कोणीतरी अतिश्रेठ पुरुष असावेत. यम, वायू, इंद्र व अश्विनीकुमार या पाच देवतांच्या अंगी आपण जे गुण कल्पिले आहेत तेच गुण या पाच पुरुषांच्या अंगी असावेत किंवा नंतर पांडवांच्या अंगी या पाच देवतांप्रमाणेच गुण दिसल्यामुळे त्यांनी ही देवतांची कारणे पुढे आणली असावीत. रीतसर नियोगविधीने पांडव झाले. त्यामुळे पांडू, कुंती व माद्री यांना ते पुरुष कोण आहेत हे माहीत असावे. पण काही अज्ञात कारणामुळे त्या पाच पुरुषांची नावे सांगणे त्यांना इष्ट वाटले नसावे. ती कारणे वैयक्तिक असतील, सामाजिक असतील, राजकीय असतील किंवा इतर काही असतील. पण त्या पाच पुरुषांची नावे सांगण्यापेक्षा पाच देवतांची नावे सांगणे त्यांना सोयीचे वाटले असावे.

कर्णाची कवचकुंडले हीदेखील एक अशक्य अशी वाटणारी घटना आहे. जन्मत:च कर्णाच्या अंगावर सोनेरी कवच व कानात रत्नजडित कुंडले होती. ही कवचकुंडले जोपर्यंत त्याच्या शरीरावर आहेत तोपर्यंत युद्धामध्ये त्याला कोणीही ठार मारू शकणार नाही, अशी सर्वांची व त्याचीही समजूत होती. पांडवांच्या वनवासाची बारा वर्षे पूर्ण होऊन तेरावे वर्ष सुरू असता इंद्राने म्हणजे अर्जुनाच्या वडिलांनी कर्णाची ती कवच कुंडले काढून घेण्याचे ठरविले. त्यामुळे युद्धात त्याचा पराभव होईल व युद्ध झाले तर तो पांडवांना भारी पडणार नाही, हा इंद्राच्या मनातला हेतू होता. कर्ण दानशूर होता. त्याच्याजवळ कोणी काहीही मागितले तरी तो रिकाम्या हाताने त्या याचकाला परत पाठवित नसे. त्यामुळे जेव्हा इंद्राने त्याच्याकडे कवचकुंडले मागितली तेव्हा त्याने ती द्यायची तयारी दाखवली. ती कवचकुंडले जन्मत:च असल्यामुळे तीक्ष्ण हत्याराने त्याला ती काढावी लागली व त्यावेळी रक्ताच्या धारा लागल्या होत्या. ती रक्ताने भिजलेली कवचकुंडले त्याने इंद्राला देऊन टाकली. जन्मत:च कवचकुंडले हा प्रकार जरा अद्‌भुतच वाटतो. पण खरेतर कर्णाच्या अंगावर ही कवचकुंडले म्हणजे जन्मखुणा असाव्यात. तीळ, मस, चामखीळ, तुळशीपत्र, शिबे अशा जन्मखुणा पुष्कळांच्या अंगावर आपल्याला दिसतात. शिवाय त्या जन्मखुणा रंगीबेरंगी असतात व तेथील कातडी जाड नी चिवट असते हेही आपल्याला प्रत्यक्ष दिसते. कर्णाच्या छातीवर नी पाठीवर अशीच जन्मखूण असावी व तिचा रंग सोनेरी असावा आणि त्या ठिकाणीच कातडी जाड व चिवट असावी असा तर्क करता येण्यासारखा आहे. कर्णाने शरीरावरील कवच कापून काढले तेव्हा ते ओले होते असे महाभारतकार सांगतात. अंगावरची कातडी कापून काढली तर ती रक्ताने ओली झाली असणारच. कर्णाच्या कानांना मासाच्या गोळ्या चिकटलेल्या असाव्यात आणि आकार, रचना व रंग यामुळे त्या रत्नजडित कुंडलांसारख्या दिसत असाव्यात. हा तर्क करता येण्याजोगा आहे. यात नवीन असे काहीच नाही. जन्मत: नाकाला किंवा कानाला मांसाच्या गोळ्या चिकटलेल्या असणे, अंगावरची कातडी काही ठिकाणी रंगीबेरंगी असणे, जाड व चिवट असणे, हृदय डावीकडे असण्याऐवजी उजवीकडे असणे, एका डोक्याऐवजी दोन डोकी असणे, मूत्रपिंड दोन असण्याऐवजी एकच असणे, अन्ननलिका किंवा मलविसर्जनाचा मार्ग अजिबात नसणे. असले चमत्कार आपण ऐकलेले आहेत. असले चमत्कार कितीवेळा घडले ते माहीत नाही पण कमीत कमी एकदा तरी ते घडून गेले याची नोंद आहे. त्यामुळे कर्णाच्या छातीची व पाठीची कातडी सोनेरी रंगाची, जाड व चिवट असावी आणि म्हणूनच त्याच्या अंगावर कवच असल्यासारखा भास होत असावा. तशीच रंगीबेरंगी मांसाचे गोळे त्याच्या कानावर असावेत व ते सुंदर रंग,

मोहक ठेवण व सुंदर आकारामुळे रत्नजडित कुंडलासारखे दिसत असावे, असा तर्क करता येतो.

पुन्हा एकदा...

महाभारत हा काव्यरूप इतिहास आहे. व्यासांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि विश्वसनीय व्यक्तींकडून ऐकलेल्या घटना या महाभारतात त्यांनी दिलेल्या आहेत. महाभारतातील सर्व पात्रे (प्रमुख पात्रे) ही होऊन गेलेली आहेत. त्या काल्पनिक व्यक्तीही नाहीत. पण ते सर्व मानवच होते. ईश्वरी अवतार नव्हते. महाभारतात काही घटना अशा आहेत की आजच्या काळात आपण त्यांचा विचार केल्यास त्या आपणास पटणार नाहीत. पण वैज्ञानिक दृष्टीने तपासून पाहिल्या तरच त्यांचे मर्म लक्षात घेता येईल. या अद्भुत घटना श्रद्धाळूपणे जशाच्या तशा मान्य करणे चुकीचे आहे. जर त्यावर नीट विचार केला तर त्यातील प्रत्येक घटना त्याकाळातील लोकांची वैचारिक पार्श्वभूमी व राजकीय आणि सामाजिक परिस्थिती दर्शविते.

महाभारतातील सर्व व्यक्ती ह्यासुद्धा मानवाचीच संतती होत्या. ती सुद्धा आपल्यासारखीच माणसे होती. त्यांच्यातसुद्धा काही गुण होते व काही दोषही होते. श्रीकृष्णासारखी व्यक्ती ही महाभारतातील आदरणीय व्यक्तींपैकी एक होती. श्रीकृष्णाने आपल्या कृतीमधून अनेक संदेश लोकांना दिले. पण लोकांनी त्यांच्या जन्माला अवतारकार्य मानून त्यांची पूजा केली. ते ठीक आहे. पण त्यांची पाना-फुलांनी पूजा करण्यापेक्षा, त्यांच्या फक्त विचारांवर श्रद्धा ठेवण्यापेक्षा त्यांच्याप्रमाणे आचार ठेवून त्यांच्या गीतेतील संदेशाप्रमाणे त्यांची पूजा करावी असे कुणाला वाटत नाही. तेव्हा श्रद्धाहीन दृष्टीने, शस्त्रवादी दृष्टीने, बुद्धीवादी भूमिकेवरून त्या व्यक्तींच्या जीवनाकडे बघितले, त्यांचे निरीक्षण केले तर त्यांचे खरे दर्शन घडू शकते.

आम्ही महाभारताचा अभ्यास मर्यादित काळात केला व त्यातील जास्तीत जास्त चमत्कारिक घटना जन्मांविषयी आहेत. महाभारतकारांनी यात बऱ्याच गोष्टी रचल्या असाव्यात असे वाटते. पण त्यांना अशा कल्पित कथा रचण्याची जरुरी का वाटावी? तेव्हा असे वाटते की कुळाने थोर असलेल्या किंवा पुढे थोर ठरलेल्या काही व्यक्तींची जन्मरहस्ये अज्ञात होती किंवा संशयास्पद होती. अशा व्यक्तींच्या जन्मासंबंधीचे घोटाळे उलगडून त्यांची प्रतिष्ठा अबाधित ठेवण्याच्या उद्देशाने काहीतरी अद्भुत कथा रचणे त्यांना आवश्यक वाटले असावे.

एकंदर या अद्भूत कथा रचण्याचा एकच उद्देश असावा व ते स्पष्ट आहे. त्या व्यक्तींची मातापितरे व त्यांचे कुलशील याविषयी अज्ञान तरी असावे किंवा त्यांच्या जन्मरहस्यात राजकीय, सामाजिक किंवा नैतिक दृष्टीने काही कमीपणा असावा, काही गौणत्व असावे त्या अज्ञानावर किंवा गौणत्वावर पांघरूण घालण्यासाठी या कथा रचल्या असाव्यात. 'देवाची करणी' या नावाखाली अजूनही अशा कथांवर विश्वास ठेवणारे लोक आपल्याला आजच्या समाजातही आढळून येतात. त्यामुळेच त्या असीम श्रद्धेच्या काळात अशा अद्भूत कथा चटकन स्वीकारल्या गेल्या.

यातला मूळ उद्देश म्हणजे त्या कथेतून लोकांच्या मनावर काही एक विशिष्ट मूल्य ठसविणे असा असावा. सामाजिक नीतिमूल्यांचा बोध देण्यासाठी यातील बहुतांश कथा रचल्या असाव्यात.


**- माधुरी पाटील, कीर्ती शिंगोटे,**
**सुचेता जोशी, प्राची प्रधान,**
**स्वाती वैशंपायन, पल्लवी जाधव**

(या प्रथम वर्षाच्या १९९२-९३ च्या सुमारास असणाऱ्या विद्यार्थीनी होत्या)

# डॉ. मी. दि.पराडकर यांचे आत्मकथन

**भाग - ५**

अध्यक्षपदासाठी एकदा नाव दिल्यावर ते मागे घेणं मला प्रशस्त वाटलं नाही. आश्चर्य असं की उषा मेहता आणि पॉलिटिक्स डिपार्टमेंटमध्ये काम करणारे काही लोक माझ्या डिपार्टमेंटमध्ये आले (मी तेव्हा संस्कृतचा लेक्चरर होतो) आणि त्यांनी सांगितलं, 'We want to discuss about your candidature.' मी म्हटलं, 'What is that you want to discuss?' तेव्हा ते म्हणाले, 'आम्ही तुम्हाला असं सांगायला आलोय की तुम्ही नाव मागे घ्या. कारण जो अध्यक्ष होणार आहे आपल्या असोसिएशनचा, त्याला कदाचित आमच्या कुलगुरूंच्या विरोधात भूमिका मांडण्याचा प्रसंग येईल.' मी म्हटलं, 'याचा अर्थ तुम्ही टीचर्स असोसिएशनला ब्रँडेड बॉडी समजता.' तेव्हा ते म्हणाले, 'नाही, नाही. तसं नाही. पण कदाचित् असं होण्याचा संभव आहे आणि मग तुम्हाला त्यांच्या विरोधात उभं रहाणे हे इथल्या नोकरीमध्ये अडचणीचं ठरण्याचा संभव आहे.' मी म्हटलं, 'जर तसं असेल तर युनिव्हर्सिटीच्या पॉलिटिक्स डिपार्टमेंटमध्ये काम करणारी व्यक्ति व्हाईस प्रेसिडेंट म्हणून कशी उभी राहू शकते? जर ती व्हाईस प्रेसिडेंट म्हणून उभी रहात असेल तर प्रेसिडेंट म्हणून उभं रहाण्यात मला काही तात्त्विक अडचण दिसत नाही आणि विरोध करायचा प्रसंग जर आला तर मी विरोध टीचर्स असो. चा अध्यक्ष म्हणून करीन. या दोन गोष्टी तर्कदृष्ट्या वेगळ्या आहेत, असं मी समजतो. तेव्हा म्हणाले, 'No, we just wanted to persuade you.' हे persuasion नव्हतं. ही एकतऱ्हेची धमकीच होती. अशा धमक्यांना घाबरण्याचं मला काही प्रयोजन नव्हतं.



मग काय? सर्व विद्यापीठातली यंत्रणा माझ्या विरोधात होती. माझ्या असो.च्या लोकांनी सांगितले की ज्यादिवशी निवडणूक होती. त्या दिवशी तुम्ही तिथे प्रत्येकाला सांगायला उभे रहा. मी म्हटलं, 'रहाणार नाही. कारण हे माझ्या तंत्रात बसत नाही. ज्यांना माहिती आहे त्यांना माहित आहेच. ज्यांना माहित नाही आणि ज्यांना द्यायचे नाही ते मला पाहून मत देतील याच्यावर माझा विश्वास नाही.' आणि असं canvassing करण्याची मला गरज नव्हती. मला नंतर कळलं की त्या लोकांनी निरनिराळ्या कॉलेजेस्मध्ये लोकांना पाठवलं. (युनिव्हर्सिटीच्या पंखाखाली अनेक लोक असतात हे सर्वांना माहित आहेच.) खालसा कॉलेजमधल्या माझ्या एका परिचिताने मला हे सांगितलं. 'अहो, युनिव्हर्सिटीमधून लोक तुमच्याविरुद्ध प्रचार करायला आले होते.' मी म्हटलं, 'अहो, निवडणुकीला उभं रहायल्यानंतर प्रचार करावाच लागतो. मला निवडून द्या असं म्हणावच लागतं. मी म्हणत नाही कारण मला त्यामध्ये प्रतिष्ठा वाटत नाही.' पण ते पुढे म्हणाले, 'आमच्या कॉलेजमध्ये लोकांनी एकमुखाने सांगितलं की, पराडकर आमच्या कॉलेजमध्ये आलेले नाहीत. पण आम्ही मत त्यांनाच देणार आहोत.' प्रत्येक कॉलेजला हे असं होईल, असं कसं सांगता येईल? शेवटी इलेक्शन झालं. मी तिथे गेलोच नाही. एकंदर मला आठ का नऊ मतं कमी पडली. बाकीचे तिथले लोक म्हणू लागले की पराडकरांनी एवढा तीव्र संघर्ष केला हे आश्चर्य आहे. कारण ते तर इथे आलेले नाहीत ! तेव्हा आमचा विजय हा सुद्धा काही खरा नाही.

अर्थात् हा विषय मी सोडलाच होता. पंधरा-वीस दिवसांनी मला एका गृहस्थांचा फोन आला. ते म्हणाले, 'तुमचं अभिनंदन ! पहिल्याच मिटिंगमध्ये एक ठराव आला आणि तो ठराव व्हाईस चॅन्सेलरच्या निर्णयाला आव्हान देणारा होता. हा ठराव पास होऊ नये असं अध्यक्ष म्हणनू निवडून आलेल्या वीणा गजेन्द्रगडकरांचं आणि उपाध्यक्षांचं मत होतं. आता अध्यक्षांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.' मी म्हटलं, 'हे सगळं ठीक आहे, पण तुम्ही माझं अभिनंदन का करताय ते मला अजून कळलेलं नाही.' ते म्हणाले, 'अहो, आता तुम्ही परत उभं राहू शकता.' मी म्हटलं, 'आता मला मतदात्यांची कुवत कळलेली आहे. तेव्हा आता मला कुणी सांगितलं तरी मी उभा राहणार नाही.' ज्या असो.चे पदाधिकारी सर्व लोकांना संमत असलेला निर्णय कुलगुरूंसाठी बदलतात, असे अधिकारी असून उपयोग काय?

मग मला असं कळलं की मला विरोध प्रत्यक्ष जस्टिस् गजेन्द्रगडकरांचा होता. (त्यांचे एक पुतणे लिंग्विस्टिक्सचे रीडर होते) यांचा विरोध असण्याचे कारण काय? मी व्याख्यानांमधून आमच्या भाषा माध्यम असाव्यात, असा आग्रह धरला हे कुलगुरू हे इंग्रजीच्या बाजूचे होते. त्यामुळे एकंदरीत मी अधिकाऱ्यांच्या पक्षातला नव्हे असं मत होऊन गेलं.

(रा. ना. दांडेकरांचं असं मत होतं की रिसर्च जर होण्यासारखा असेल तर फक्त ऋग्वेद आणि व्याकरण या दोहोतच होऊ शकतो. अर्थात् हे ते बोलून दाखवणार नाहीत. कारण सांगणं वाईट दिसतं. 'तुम्ही इथ तरी शास्त्र शिकवता का?' असं मला त्यांनी इंटरव्ह्यूमध्ये का विचारलं, हे मला नेहमीप्रमाणे उशीरा कळते.

मानसिकदृष्ट्या कुलगुरू विरोधात असल्यामुळे वेलणकर गेल्यावर मला Tempararily In-charge केलं हे का? तर मला काही भत्ते मिळू नयेत. माझ्याविरुद्ध एक मोहीम चालवली जात होती. भटांनी यात पुढाकार घेतला होता हे मला नंतर कळलं.

तेव्हा मला त्यांनी रीडर न करता (ठरवूनच !) खामगावचे सदाशिव अंबादास डांगे यांची नेमणूक केली. वस्तुत: त्यांची नेमणूक झाल्याचं पत्र मला यायला हवं होतं. मी तात्पुरता का होईना पण इनचार्ज ऑफ दि डिपार्टमेंट होतो. ते आलं नाही. बरं, मला रीडर म्हणून नेमलं नाही याचं पत्र तेही आलं नाही कारण तसं करण्याची युनिव्हर्सिटीची पद्धत नाही. अमुक दिवसापासून चार्ज घ्या, असं त्यांना सांगितल्यामुळे ते आले. आमच्या डिपार्टमेंटचे लेले (यांची बायको माझी रुईयातली विद्यार्थिनी)माझ्याकडे आले. डांगेंना घेऊन. मी डांगेंना म्हटलं, 'व्यक्तिश: तुमची माझी ओळख आहे म्हणून मी तुम्हाला बसायला खुर्ची देतो. पण चार्ज हवा असेल तर युनिव्हर्सिटीकडलं पत्र लागेल मला. कारण मी इन् चार्ज ऑफ दि डिपार्टमेंट आहे. त्यामुळे आधी माझ्याकडे पत्र यायला पाहिजे.' ते म्हणाले, 'पराडकर, आय ॲग्री विथ यू. मला आता पुन्हा यायला दोन दिवस लागतील पण मी ते घेऊन येतो.'

ते गेले आणि मी माझ्या राजीनाम्याचे पत्र लिहायला घेतलं. घरी मी अर्थात् सौभाग्यवतीशी बोललो होतो आणि दुसरी नोकरी नसताना मला, माझ्या बाबतीतल्या मताला, तिने दुजोरा दिला हा तिचादेखील मोठेपणाच. आमचे लेले म्हणाले, 'हा राजीनामा तुम्ही देताय हे तुमच्या दृष्टीने बरोबरच आहे. पण हे सगळं वाईट आहे.' मी हसलो. म्हणालो, 'वाईट गोष्टी पुष्कळ आहेत. त्यातलीच ही एक. असं समजून तुम्ही पुढची कार्यवाही करा.' माझं तत्त्व त्यात असं सांभाळलं गेलं की एक दिवसही मी त्यांच्या हाताखाली काम केलं नाही. मी सुट्टी घेतली आणि हेडक्लार्क लेल्यांना सांगून ठेवलं की कुणी माझ्याबद्दल विचारलं तर मी रजेवर आहे म्हणून सांगा. पाहिजे असलं तरी घरी कुणी फोन करील. याची कुणकुण विद्यार्थ्यांना लागली. वसुंधरा पेंडसे मला विचारायला आली की सर

तुम्ही राजीनामा दिलाय असं कळलं. पण मला तिच्याशी या बाबतीत काही बोलायचं नव्हतं. म्हटलं, 'हा काही तुझा प्रश्न नाही.' विद्यार्थ्यांना कळून काही व्हायला मला नको होतं. मला माझ्या तंत्रात बसत नाही, असं वाटलं. हल्ली विद्यार्थ्यांचे मोर्चे वगैरे काढले जाऊन दडपण आणलं जातं, असं ऐकतो.

एक दिवस मी तिथे गेलो असताना रजिस्ट्रार चिदंबरम् यांचा निरोप आला की तुम्ही मला भेटून जा. मला म्हणाले, 'I want to talk to you about your Resignation.' मी म्हटलं, 'What are you going to talk?' म्हणाले, 'I would like you to withdraw.' मी म्हटलं, 'Any Reason?' म्हणाले, 'IT'S NOT GOOD FOR YOU TO SEND STRAIGHTWAY A RESIGNATION LIKE THIS.' मी म्हटलं, 'What do you expect me to do?' म्हणाले, 'Looking at the position of Sanskrit.' मी त्यांना अर्ध तोडत म्हटलं, 'Please do not raise irrelevant issue.' अहो, त्यांना पाच मिनिटं बोलवेना. त्यांनी अशा वाक्याची अपेक्षाच केली नव्हती. मी पुढे म्हटलं, This is not the question of Sanskrit. This is the question of position of Paradkar. म्हणून Irrelevent मी म्हटलं. ते म्हणाले, "This is logically correct. But I have to requesat you let me try for it." मी म्हटलं. Resignation still lies with you. You have not still conveyed to me that it is accepted. Therefore you can do, you can. I am sure that you will not succed'' म्हणाले, I intend to put you in Reader's seale immediately." मी म्हटलं, Mr. Chidambarm that will not do now. Now, I will require Readership with Seniority. Few days earlier or a month earlier; I should have it. तरंच आता हे होऊ शकेल. असं म्हणून मी निघून आलो.

एक दिवस दुपारी VICE-CHANCELLOR फोन आला. जस्टिस गजेन्द्रगडकरांना Dr. Paradkar will you plese find some time to see me in my office in University ?" मी म्हटलं. "What time is convenient for you ?" "Any time after Six" ठीक आहे म्हटलं गेलो. म्हणाले, '' काय पराडकर, तुम्ही राजीनामा दिलाय ? मी म्हटलं, '' हो, तो आता जुना झालायं''

''नाही हो. आम्ही तो स्वीकारत नाही तो पर्यंत तो जुना होत नाही.''

'' हे तत्त्वतः बरोबर आहे. पण माझ्या दृष्टीने जुनाच!''

'' पण अहो, तुम्ही एकदम राजीनामा दिलात ?''

'' मग तुमची काय अपेक्षा होती ? मी काय करावं? तुम्हाला येऊन भेटावं ?''

'' नाही पण एक आम्हाला म्हणायला पाहिजे we have done everything legally."

'' हे सांगण्यासाठी तुम्ही मला बोलावलंत ? Sir, Iniustice can be done legally."

" Paradkar, you are very logical."

मी ऐकतो काय ? "I am known for that" त्यांना ही अपेक्षाच नव्हती. त्यांना असं वाटत होतं की सगळेच लोक पंखाखाली असतात. ही आमच्या जस्टिसची केविलवाणी अवस्था आहे.

म्हणाले , '' Let us discuss......"

मी म्हटलं , "Where is the point in discussing ? You can allow me to leave."

म्हणाले, '' नाही, नाही You have been one of the Best Teachers in the University."

मी म्हटलं, "Sir, about my Teaching Ability you are not likely to know. About my position in Sanskrit in Bombay University, as you were not here, You were in Delhi. You are not likely to know. I am not surprised about it. It is only natural. There have been incidents here trying to malign me . Teachers working in University are a party to it.

"You straight away say so......"

मी म्हटलं, " In our decipline we never say anything for which we have no support." मी मग नावं घेऊन सांगितलं. संस्कृत-प्राकृत डिपाटरमेंटतर्फे कॉन्फरन्सला प्रतिनिधी म्हणून कुणाला पाठवायचं असा जेव्हा विचार झाला, तेव्हा असं नाही वाटत तुम्हाला की माझचं नाव यायला हवं होतं ? दुसरं कुणी तेव्हा नव्हतंच खात्यामधे.

"No, That is perfectly logical.:

मी म्हटलं, " Logic has no place in the University." लिंग्विस्टिकचा मनुष्य (त्यांचा पुतण्या हा भाई-भतीजा वाद) संस्कृततर्फे युनिव्हर्सिटी रिप्रेझेंट करायला गेला हे त्यांना माहित होत. त्यामुळे ते फार खोलात गेले नाहीत.

ते म्हणाले,' काय आहे, बोद्धारो मत्सरग्रस्त :'

" Yes, I live among these. And therefore i want to go away form it."

''पण आम्ही तुम्हाला सांगतो की, Not only we have done everything legally. But I know that you have done sufficient work in Hindi."

"Yes I am glad that you have come to know about it. In Hindi field, they do not work as wer work in University here. There, service to the subject counts."

याचा अर्थ त्यांना कळला ! आणि म्हटलं, "Yes, your know its origin. I had applied for being he Vice-chairman of Bombai Hindi Vidyapeeth" मी तांत्रिकदृष्ट्या त्यांच्याकडून परवानगीही घेतली होती. कारण हे तांत्रिकदृष्ट्या आवश्यक आहे हे मला माहित होतं. वस्तुतः ती काही PAID POST नव्हे पण तरीही ......!

मी म्हणालो, "It is only on the basis of my service that they have chosen me as the Vice-Chancelor."

हा मनुष्य इतका अप्रमाणिक, की मला म्हणतो, " I tried for you in Hindi. मी म्हटलं, "Is it true?" खरं तर हे साफ खोटं. असं मुळी करताच येत नाही.

शेवटी मला म्हणाले, '' तुम्ही कुठे जायचे ठरवलंय ? '' असं विचारण चांगल नाही. खर म्हणजे असं विचारण्यातलं इंगित मला नंतर कळलं. मी त्यांना सांगितलं, Sir, I am not bound to disclose it to you. I am only bound to disclose to you that I have decided to leave the University.

ज्यांची अशी शोभा झाली ते गजेन्द्रगडकर शेवटी मला म्हणतात, "Thank you for coming."

मी निघून आलो. एलफिस्टनचे संस्कृत-प्राकृत विभागाचे अध्यक्ष डॉ. पोतदार गुरुवर्य देशपांड्यांना नंतर म्हणाले "R.R. That was a clash between two Vice-Chancelors, in which your V.C. has won."

पारेख तेव्हां रेक्टर होते ते मला म्हणाले, "Paradkar, you were very wise in not disclosing where you go" म्हणाले की, ते (गजेन्द्रगडकर इतके सूड घेणारे आहेत की तुम्ही जिथे जाताय तिथं कळवलं असतं की यांना घेऊ नका !

मग मला पालघर कॉलेजच्या सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळीकडून बोलावणं आलं. इंटरव्ह्यूसाठी. त्या संस्थेचे अध्यक्ष भोगीलाल शहा यांचा मुलगा नवनीतभाई शहा (समाजवाद्यांचे तत्कालीन अध्वर्यू) हे तिथे होते. सल्लागार होते बोर्डीचे आचार्य भिसे.

प्रसिद्ध बखरकार डॉ. र. वि. हेरवाडकर हेही माझ्याबरोबर इंटरव्ह्यूला होते. माझे मित्र श्री. सुर्वे आणि उल्हासनगरला प्रिन्सिपॉल असलेले डॉ. रा. वि. भागवत यांनी मला अगोदर सांगितले होते की पराडकर, तुम्हाला अशा स्वरूपाचे प्रश्न विचारले जातील. तेव्हा तुम्ही तयारी करुन जा. या दोघांना माझ्याबद्दल आस्था. भागवतांची माझी रुईया कॉलेजमधील विद्यार्थीदशेतील मैत्री.

गंमत म्हणजे भोगीलाल भाईंनी मला येताना माझी पुस्तके घेऊन यायला सांगितले होते. मी म्हटले ते काही शक्य नाही! अन्यथा मला एखादा हमालच करावा लागेल! भोगीलाल उत्तम व्यापारी खरे. पण साहित्यात त्यांना मती बेताचीच. इंटरव्ह्यूच्यावेळी पुस्तक कुणी आणत नसतो याची त्या बिचाऱ्यांना माहिती नव्हती.

इंटरव्ह्यूमधे त्यांनी मला प्रशासनाचा अनुभव आहे का हे विचारलं, तो होताच माझ्याजवळ. १९५६ पासून मी हिन्दी विद्यापीठांत आहे. त्यामुळे प्रशासनात माणसाने किती दक्ष असावं आणि तरीसुद्धा जे चूक आहे त्याला चूक म्हणण्याची तयारी ठेवावी हे मला माहित होतं. अप्रियता पत्करणे हे प्रशासकांच वैशिष्ट्य आहे. मी कुणाचं नुकसान केलं नाही हे खरे आहे. कारण माझा एक सिद्धांत आहे की माणूस फार कमी लोकांच कमी चांगलं करु शकतो.

आचार्य भिसे यांनी त्या मंडळींना सल्ला दिला की पराडकर जो सांगतील तो पगार देऊन त्यांना प्राचार्य म्हणून नेमा. त्यामुळे माझी निवड निश्चित झाली होती. (ते त्या लोकांना म्हणाले आधी पराडकर इकडे यायला तयार झालेत हेच आश्चर्य आहे. त्यांना काय माहित की मी इकडे बेकारच बसलोय !)

हेरवाडकर जरी माझे त्यावेळी स्पर्धक होते आणि माझी निवड झाली, तरी त्यांनी ते काही मनात ठेवलं नाही. पुढे जेव्हा त्यांनी त्यांचा राजवाड्यांवरचा ग्रंथ काढला तेव्हा त्यांनी घरी येऊन मला विचारलं की तुम्ही 'राजवाडे आणि लेक्सिकोग्राफी' यावर लिहाल का. मी म्हटलं लिहीन. लेक्सिकोग्राफी म्हणजे कोशकार्य. ते त्या पुस्तकात छापून आलं. मूळ पुस्तक 'राजवाडे ॲण्ड हिज थॉटस्' अशा शीर्षकाचे आहे.

मी कुठे कुठे काय काय लिहिलय हे कधी कधी माझं मलाच आठवत नाही. परवा आमच्या एका स्नेह्याशी बोलताना मी म्हटलं, नाविकांसाठी एक कोश केलाय मी, योगायोगाने परवा बघताना मला ते पुस्तक मिळालं. इंग्रजीमधे असे कोश आहेत. नौकानयनाच्या क्षेत्रात ज्यांना शिकायचंय त्या सगळ्यांचं इंग्रजीतून शिक्षण झालेलं नसतं. त्यामुळे त्यांना हिन्दीमधे असेल तर सोयीचं जातं म्हणून मी ते केलं.

तर मुद्दा असा की मी इंटरव्ह्यूमधे पास झालो. ठाणे जिल्हा त्यावेळी पुणे विद्यापीठाच्या क्षेत्रात येत होता. त्यामुळे तिथले ॲकॅडमिक कौन्सिलचे प्रमुख अशा बाबतीत महत्त्वाचे असत. ते होते इंग्रजीचे प्राध्यापक मालेगांवकर. जेव्हा माझी ही निवड झाली तेव्हा या मंडळीनी तसे पुणे विद्यापीठाला कळवले. हे इंग्रजीचे प्राध्यापक पुण्याच्या एस्.पी. कॉलेज हे आमच्या रुईया कॉलेजच्या मंडळीनी चालवलेले आहे. त्यांनी या मंडळीला लेखी पत्र तर पाठवलं. पण तोंडी सांगितलं की 'पराडकर जर हे स्वीकारत असतील तर आम्ही आमच्या अटीही शिथिल करयला तयार आहोत ! पण तुम्ही त्यांना प्रिन्सिपॉल म्हणून घ्या.' मला हे अर्थात् नंतर कळलं.

या मंडळींचे विश्वस्त होते वि. स. पागे आणि एक सल्लागार होते बाळासाहेब भारदे. या लोकांशी माझी माझ्या विषयामुळे चांगली ओळख होतीच. माझ्या 'स्टडीज इन दि गीता' या पुस्तकाला मी पाग्यांकडून प्रस्तावना घेतली आहे. (गीतेवरचं माझं हे निराळं संपादित पुस्तक आहे.) त्यामुळे तिथे गेल्यावर पागे जेव्हा एकदा विश्वस्त म्हणून आले तेव्हा आमची माणसं त्यांची माझी ओळख करुन देऊ लागले. तेव्हा पागे म्हणाले, ''वा! तुम्ही आमची ओळख करुन देतायं ?! आम्ही त्यांना फार चांगले ओळखतो. त्यांचा आमचा विषयच निराळा आहे.''

**- डॉ. मो.दि. पराडकर**

# श्री. शरद साठे यांची मुलाखत

*दाते ग्रंथ सूची १९५० पर्यंत आहे. त्यानंतरच्या काळातील ग्रंथांची अशी सूची नाही. ही उणीव होती. अभ्यासकांच्या दृष्टीने असणारी ही उणीव भरून काढण्यासाठी डोंबिवलीतील श्री. शरद साठे यांनी पुढाकार घेऊन जे कार्य केले ते* अजोड आहे. आमची विद्यार्थिनी सौ. दीपाली हिला श्री. साठे यांची 'दिशा'साठी मुलाखत घेण्याचे काम आम्ही सांगितले होते. ती ही मुलाखत - *संपादक*

**आपण व्यवसायाने वेगळ्या क्षेत्रात असूनही दातेंच्या ग्रंथसूचीचे पुढील काम करावे असे आपणास का वाटते?**

- व्यवसायाने वेगळ्या म्हणजे मी बँकेमध्ये नोकरी करीत होतो; परंतु १९७१ मध्ये मी M.A.केले. मराठी आणि संस्कृत या विषयात त्यानंतर Ph. D. करण्याचा विचार होता परंतु बँकेतील नोकरी सुरू होती आणि कोणीतरी मला सांगितले की 'सिद्धार्थ कॉलेजमध्ये लायब्ररीचा १ वर्षाचा सर्टिफिकेट कोर्स चालतो. त्याला प्रवेश घेतला. तेथे श्री. रेगे सर, श्री. गणपुले सर होते शिकवायला आम्हाला. त्या अभ्यासक्रमादरम्यान माझा पुस्तकांविषयीचा दृष्टिकोन खूप बदलला, वाचकांचे वेगवेगळे दृष्टिकोन समजले, वाचकांच्या मागण्यांना मदत करण्याचे वेगवेगळे मार्ग समजले. त्याच दरम्यान संदर्भ पुस्तके (Reference Book) पाहण्यात आली आणि याच क्षेत्रात काहीतरी करावे असे मला वाटू लागले. मग १९७३-७४ मध्ये ज्ञानेश्वरी पदकोश पाहण्यात आला आणि अशाच प्रकारे 'अमृतानुभव'ची शब्दसूची बनविण्याचे काम मी हौसेखातर सुरू केले. पुढे १९८९ मध्ये 'अमृतानुभवाचा पदसंदर्भ कोश' या नावाने मुंबई विद्यापीठ आणि मराठी संशोधन मंडळ यांनी ते संयुक्तपणे प्रकाशितही केले. या कामाबरोबरच ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांचे अभंग, ओव्यांचे, मर्ढेकरांच्या कवितांचे Word Index, Line Index (चरण सूची) चे कामही केले. परंतु हे सर्व कॉंकरडस छापण्यासाठी खूप खर्च येतो असे वाटले म्हणून मग फक्त ते तयार करून ग्रंथालयांमध्ये अभ्यासकांसाठी ठेवून दिले. ते सर्व काम लक्षात घेऊन असेल कदाचित जून १९९५ मध्ये कोश, सूची या विषयावर पुणे येथील चर्चासत्रासाठी मला बोलावणे आले. तेथे माझा सत्कारही करण्यात आला. आणि या चर्चासत्रामध्ये दाते सूचीच्या पुढील कामासंबंधी बोलणे झाले. संघ तयार करून हे काम करावे याविषयी चर्चाही झाली. परंतु संघकार्यावर माझा फारसा विश्वास नाही आणि कोठे एके ठिकाणी नियमित जाऊन काम करणे वगैरे मला जमलेही नसते म्हणून मी काही त्यामध्ये फारशी सहमती दर्शविली नाही आणि त्यांच्या चर्चेचा पुढे काही ठाम निर्णयही झाला नाही.

पुढे डिसेंबर १९९५ मध्ये मी निवृत्त व्हायचे मी आधी ठरविलेच होते तेव्हा निवृत्तीनंतर दाते सूचीचे कामही आपणच करायचे असेही ठरवून टाकले आणि जून ते डिसेंबरपर्यंत साधनांची जमवाजमव करणे सुरू केले. I NB चे सर्व खंड Examiner Book Center चे ४० वर्षांचे कॅटलॉग खरेदी केले. काहींच्या झेरॉक्स काढाव्या लागल्या. यासाठी साधा लॉट रु. १०,०००/- खर्च केले आणि १९९६ जानेवारीमध्ये कामाला सुरुवात केली. राज्य मराठी विकास संस्थेच्या सरोजिनी वैद्य मला या कामासंबंधी प्रोजेक्ट संस्थेला सादर करा असे नेहमीच सांगत होत्या म्हणून मग दाखवण्याजोगे काम तयार झाले. तेव्हा प्रोजेक्ट स्वरूपात संस्थेला सादर केले तोपर्यंत या कामावर माझे रु. ४,०००/- मी खर्च केले होते. परंतु मग प्रोजेक्ट मंजूर झाला. २००० सालापर्यंत संपूर्ण ग्रंथही तयार झाला.

**हे काम करताना आपल्याला आलेले महत्त्वाचे अनुभव कोणते?**

चांगला अनुभव म्हणजे सरोजिनी वैद्य यांचे वारंवार सहकार्य लाभले आणि तसेच इतरांचेही लाभले. त्या सर्वांचा उल्लेख मी ग्रंथामध्ये केलेलाच आहे. अडचणी म्हणजे सर्वात पहिली अडचण आली ती म्हणजे आपल्याकडे कायदा असूनही सर्वच प्रकाशक आपली पुस्तके राष्ट्रीय ग्रंथालयात पाठवत नाहीत. त्यामुळे INB मध्ये आणि EBC च्या कॅटलॉग मध्ये समाविष्ट नसलेली पण प्रकाशित झालेली पुस्तके शोधण्यासाठी ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची मदत घ्यावी लागली. यामध्ये वेळ जाई. तसेच नोंदींची पुनरावृत्ती टाळण्यासाठी किंवा सत्यता पडताळण्यासाठीही खूप शोधाशोध करावी लागली. ४०,००० नोंदीचे हस्तलिखित तयार करताना खूप Duplication of work झाले. आता ४ थ्या खंडाचे काम करताना ते टाळण्यासाठी मी उपाय शोधले आहेत पण त्यावेळी खूप काम झाले. तसेच मराठीतील अकारविल्हे रचना इंग्रजीतील Alphabetical रचनेपेक्षा खूप किचकट असते. ती पटकन लक्षातही रहात नाही. त्यामुळे एवढ्या नोंदीची रचना करणे खूपच कठीण होऊ लागले. मग त्यासाठी काही Numerical Code करावा असे वाटू लागले आणि मी अ-०१०, आ-०११, क-०२०, का-०२१ असा एक संख्यात्मक संकेत पट तयार केला. त्यामुळे मात्र मग हे काम खूप सोपे झाले. तसेच INB मध्ये त्यांनी विषय वर्गीकरणाकरिता D.D.C. ची १६ वी आवृत्ती वापरली आहे. ही आवृत्ती खूपच जुनी असल्याने सूचीच्या नवीन खंडासाठी मी १९ वी आवृत्ती वापरायचे ठरवले होते आणि १९ व्या आवृत्तीत सामाजिक शास्त्रे या विषयात खूप बदल झाले आहेत. त्यामुळे या विषयांना १९ व्या आवृत्तीतील विषयांमध्ये सामावून घेताना खूप अडचणी आल्या.

**दाते सूचीचे खंड आणि मराठी ग्रंथ सूचीचा हा ३ रा खंड यांच्या रचनेमध्ये किंवा स्वरूपामध्ये थोडाफार फरक दिसतो जसे त्या खंडात एकत्रित ग्रंथनाम. माला, ग्रंथकार, टोपणनाव वगैरे नोंदी आणि यात स्वतंत्र नोंदी तर आपण असा बदल का केला?**

एकत्रित ग्रंथनाम, माला किंवा ग्रंथकार, टोपणनाव, निर्देश सूची आणि प्रत्येकासाठी वेगळी निर्देश सूची या दोन्ही रचनेचे स्वत:चे फायदे तोटे आहेत. जसे एकत्रित सूचीमध्ये सर्व नावे एकाच यादीत मिळतात. पण शोधावे लागले तर वेगळ्या सूचीमध्ये पाने उलटावी लागतात. पण सर्व नावे पहावी लागत नाहीत वगैरे. पण मला एकत्रित सूची देण्यामध्ये तांत्रिक अडचण वाटली. ती म्हणजे असे करताना छपाईसाठी प्रत्येक प्रकाराला वेगळ्या खुणा द्यावा लागल्या असत्या. (इंग्रजीमध्ये Capital Letter वगैरे करता येते.) तसेच मी प्रकाशक, प्रकाशन स्थळे सुद्धा देणार होतो. तेव्हा एवढे सगळे प्रकार एकत्रित देणे किंवा त्यासाठी तेवढ्या खुणा वापरणे मला बरोबर वाटले नाही.

**Rapid Access किंवा चटकन माहिती मिळण्यासाठी आपण काही सोयी पुरविल्या आहेत (जसे अनु क्र.) त्याविषयी थोडे सांगाल का?**

याबाबतीत मला असे वाटले की नेहमी सगळ्या Index मध्ये नावापुढे जो पृष्ठक्रमांक दिला जातो ते अख्खे पान वाचकाला पहावे लागते. त्यापेक्षा अनुक्रमांक पटकन मिळतो. त्यामुळे मला हे जास्त सोयीचे वाटले.

या खंडात मी अनेक प्रकारची किंवा अनेक बाबींविषयक (जसे माला, अनुवादक, प्रकाशक स्थळे किंवा पुनरावृत्ती असेल तर प्रथमावृत्ती कधी निघाली वगैरे) माहिती जी माझ्याकडे उपलब्ध होती आणि मला देणे योग्य वाटली. ती वेगळी विषयवार किंवा वर्षवार उपलब्ध करून दिली आहे, याचा किती उपयोग होईल किंवा किती वापर होईल ते मला माहीत नाही पण माझ्याकडून जास्तीत जास्त माहिती पुरविण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**हो ही वेगळी माहिती उपलब्ध असलेले परिशिष्ट हे या ग्रंथाचे एक वैशिष्टच म्हटले पाहिजे. कारण हा भाग दातेंच्या दाने खंडातही नाही. हा जो प्रत्येक विभागावार किंवा विषयवार वर्षवार यादी तक्ते आपण या परिशिष्टामध्ये आहेत त्यामुळे ही माहिती या क्षेत्रातील संशोधकांना विनासायास तयार उपलब्ध होऊ शकते हे आपल्याला कसे सुचले?**

एक तर मी मघाशीच म्हटल्याप्रमाणे जेवढी माहिती माझ्याकडे आहे ती दिली पाहिजे, असे मला वाटले म्हणून आणि तक्त्यांच्या बाबतीत कदाचित माझ्या ऑफिसच्या कामाचा प्रभाव असेल. कारण मी Statistics Department मध्ये होतो. तेथेही मी असे अनेक तक्ते बनवत असे. तसेच परिशिष्टाची पाने खूप झाली. कारण माहिती खूप होती म्हणून मग सरोजिनी वैद्य म्हणाल्या, आपण परिशिष्ट वेगळे काढू. त्यावर नंतर खूप टीकाही झाली. सरोजिनी वैद्या यांनी नेहमी मदतच केली.

आणि या तक्त्यांच्या बाबतीत मला पुण्याचे शरद गोगटे यांचा फोन देखील आला. यातील काही तक्त्यांचा उपयोग दिल्लीतील National Book Fair मध्ये काही Slide Show साठी करून घेतल्याचे त्यांनी सांगितले.

**सूची प्रकाशित झाल्यानंतर यामध्ये आणखी काही द्यावयाचे राहिले असे आपणास वाटले का?**

जेवढी माहिती मला देण्यासारखी वाटली तेवढी मी दिली आहे. बाकी जो वर्षाप्रमाणे विषयवार किती पुस्तके प्रकाशित झाली हा जो तक्ता आहे तसेच ती कोणती पुस्तके अशी माहिती देखील देणारा तक्ता माझ्याकडे आहे पण तो देऊन त्याचा फारसा उपयोग होणार नाही किंवा पाने ही अजून वाढली असती असे वाटले तसेच पुस्तकाची किंमत आणि पृष्ठ संख्या याबाबतीत ही काही जास्तीची किंवा तक्त्या स्वरूपात माहिती देणे फारसे महत्त्वाचे वाटले नाही म्हणून दिले नाही.

**मराठीमध्ये दात्यांनी जसे काम केले तसे अन्य भाषांमध्ये झालेले आपल्या पाहण्यात आले आहे का?**

नाही. माझ्या पहाण्यात आले नाही आणि मला माहितीही नाही. National Library मध्ये मी चौकशी केली होती पण तिथेही ही माहिती मिळाली नाही.

**सूची शास्त्राचा विकास होण्याच्या दृष्टीने काय करावे असे आपणास वाटते?**

सूची शास्त्राबाबतीत नाही. पण सूची रचनेबाबत सांगायचे झाल्यास अकारविल्हे, वर्णानुक्रमाच्या आपल्याकडे अनेक पद्धती आहेत. अगदी जितके कोशकार तितक्या पद्धती असे म्हटले तरी चालेल. त्यामध्ये एकमत होत नाही. मला बरेच जणांनी Computer ची मदत घेण्याचे सुचविले म्हणून आता नव्या खंडासाठी मी दोन तीन प्रयोग केले देखिल आहेत. अजून काम सुरू आहे. परंतु Computer च्या बाबतीतही तसेच दिसून येते. त्यांच्या प्रोग्रॅममध्ये देखील एकमत नाही. मला असे वाटते, सूची रचनेसाठी एक वेगळा प्रोग्रॅम तयार करावा लागेल तसेच-

सूची कामाबाबतीत सांगायचे झाल्यास आता दात्यांनंतर या नवीन खंड प्रकाशनामध्ये खूप कालांतर पडले. मी २००० सालापर्यंतच्या पुस्तकाचे काम घेतले असले तरी ते पूर्ण होईपर्यंत पुन्हा १० वर्षांचे अंतर पडणार तर हे अंतर कमी करण्यासाठी किंवा पडूच नये यासाठी कोणा संस्थेने हे काम पुस्तक प्रकाशनाच्या समांतर पातळीवर सुरू केले पाहिजे.

आतापर्यंत तयार झालेल्या सर्व सूचींची चांगली माहिती उपलब्ध करून ठेवली पाहिजे. याबाबतीत सूचींची एक सूची माझ्या पाहण्यात आली पण त्यामध्ये ग्रंथसूची

आणि Index या दोन वेगळ्या संकल्पना एकत्रितपणे घेतल्या गेल्या आहेत म्हणूनच तसे न करता सूचींची योग्य माहिती कोठेतरी उपलब्ध झाली पाहिजे किंवा दात्यांच्या सूचीत येऊ शकलेली पुस्तके असे ही एक सूचीचे काम होऊ शकेल किंवा मराठी वाङ्मयाच्या विकासाचे काही टप्पे आहेत जसे १८०० पर्यंत प्राचीन वाङ्मय १८००-१८७४ भाषांतरित वाङ्मय पुढे आधुनिक मराठी वाङ्मय वगैरे तर दाते सूचीचेच असे काही भाग करता येतील का? कारण दाते सूचीचे जे दोन खंड आहेत ते आकाराने आणि कालखंडानेही खूप विषम आहेत.

आणि माझी एक कल्पना आहे की कवी कल्पना ठरेल की दात्यांच्या सूचीचे (सूचीतील पुस्तकांचे) एक ग्रंथालय असावे म्हणजे मग दात्यांनी सूचीमध्ये पुस्तकांचा उल्लेख केला पण पुस्तक मिळत नाही असे म्हणणाऱ्यांना उत्तर मिळेल तर अशा काही गोष्टी सांगता येतील.

वाचकहो, श्री. शरद साठे यांनी श्री. दाते यांच्यानंतर हाती घेतलेले आणि यशस्वीपणे पार पाडलेल्या या प्रचंड कामाचा परिचय आपल्याला त्यांचा ग्रंथ पाहून होतोच. हे सर्व काम पूर्ण करण्यासाठी त्यांना जवळजवळ ३$^{१}/_{२}$ वर्षे आणि साधारण ५ हजार तास लागले असे ते सांगतात. या पुढील खंडाचे त्यांचे काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे. साल २००० पर्यंतच्या कामाची जबाबदारी त्यांनी स्वीकारलेली आहेच तरीही या व्यतिरिक्त लेखकांची ग्रंथ सूची (Books by आणि Books on) यामध्ये लेखक नसलेले पण काही महान चरित्र नायक असे शिवाजी महाराज अशी सूची देखील) चे काम बरेचसे पूर्ण झाले आहे.

'दिशा'तर्फे त्यांच्या या भरीव कार्यासाठी शुभेच्छा!

- मुलाखत **सौ.दीपाली हिंदळेकर**

डोंबिवली

**परिसर वार्ता**

**ज्ञानगंगा घरोघरी**

## डॉ. राजन वेळुकर यांचा केंद्र संयोजकांशी वार्तालाप

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून डॉ. राजन वेळुकर यांनी पदभार स्वीकारताच मुंबईतील विभागीय कार्यालयात केंद्र संयोजकांची विशेष बैठक घेऊन केंद्रावर अभ्यासक्रम चालविताना येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या.

आपल्या मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विद्यापीठाचे ग्रंथालय व माहिती शास्त्र (पदवी व निष्णात) व पत्रकारिता पदविका हे अभ्यासक्रम राबविले जातात. पदवी वर्गाचे हे सहावे वर्ष, निष्णात वर्गाचे तिसरे वर्ष तर पत्रकारिता अभ्यासक्रमाचे पहिले वर्ष आहे.

विभागीय कार्यालयात सुमारे १५ ते २० केंद्र संयोजक आले होते. त्यात आपल्या बांदोडकर महाविद्यालय केंद्रातील संयोजक प्रा. मोहन पाठक हेही उपस्थित होते. मंडळातर्फे व प्राचार्यांतर्फे डॉ. वेळुकरांचे त्यांनी अभिनंदन केले व येणाऱ्या अनेक अडचणी, अनुभव कुलगुरूंना सांगितले.

# 'संत कवयित्रींनी जोपासलेले स्त्रीत्व'

*मराठी संतकवयित्रींचे साहित्य हा एक स्वतंत्र अभ्यास विषय आहे. त्यावरील हा लेख - संपादक*

महाराष्ट्राला संतकवींची जी मोठी परंपरा लाभली त्यात संत कवयित्रींचं स्थानही लक्षणीय आहे. मराठी स्त्री-संतांच्या रचनांमधून त्यांचे अनेक पदरी मनोविश्व उलगडलं गेलं आहे. त्यातून जसं त्या कालप्रवाहाचं प्रतिबिंब पडलेलं दिसतं तसं त्या रचनाकार स्त्रीच्या मनाचेही दर्शन होते. कारण काव्याचा जन्म आत्मसाक्षित्वातून होत असतो. कोणत्याही विचारांचा, कल्पनेचा अंतर्मनाला स्पर्श झाल्याशिवाय काव्योत्पत्ती होणार नाही. कौटुंबिक ताणतणावांनी त्रस्त आणि ग्रस्त असलेलं त्या काळातलं स्त्रीजीवन काव्यबद्ध झालं ते अध्यात्माच्या बैठकीवर. कारण थेट अभिव्यक्तीचा तो काळच नव्हता. मनातल्या असंतोषाला अध्यात्माचं कोंदण घालून काव्यनिर्मितीचा रास्त मार्ग त्यांनी पत्करला. एकाप्रकारे मनातल्या मुक्ततेसाठी तो अंतर्लढाच होता. भक्तिमार्ग ही जणू त्यांची अनुच्चारित चळवळच होती.

या बहुतांश संत कवयित्रींनी सामान्य माणसाचं प्रतिनिधित्व करणारं काव्य जन्माला घातलं. त्यांच्या दैनंदिन जीवनातलं दु:ख, कारुण्य, स्वत:ला झिडकारलं गेल्याची खंत, कुचंबणा, घुसमट यातून दिशापालट करण्यासाठी या कवयित्री भक्तिरचना करत गेल्या. ईश्वराशी जवळीक साधणाऱ्या या अभंगरचनांमध्ये स्वत:ला रमवत गेल्या. आपल्या दु:खमय, कष्टमय आयुष्यावर स्वत:च फुंकर घालायचा हा त्यांचा प्रयत्न असावा. फक्त त्यांना तो छुपेपणानं काढावा लागला.

या संत कवयित्रींना वाट दाखवणारं कोणीही नव्हतं. ईश्वरच त्यांच्या वाटाड्या होता. आत्मशोध ही त्यांची मुक्तीच्या वाटेवरची पहिली पायरी. त्यासाठी भक्तिमार्ग हा त्यांना विश्वासाचा वाटला. सामाजिक अर्थानेही तो रास्त मार्ग होता. त्यामुळे नि:शंक मनानं भक्तिमार्गाची वाट धरली. त्यांच्या भक्तिकाव्यातून त्यांची जी जीवनदृष्टी दिसते, त्यांना जे प्रश्न पडलेले दिसतात त्यामधून समानतेचं भाष्य, व्यक्तिगत स्वातंत्र्याचं भाष्य त्यांनी केलेलं दिसतं. भक्तिमार्ग हा या कवयित्रींना मोठाच आधार सापडल्यासारखं झालं असावं. त्यांच्या बंदिस्त जीवनाला वाचा फोडण्यासाठी अन्य माध्यमही नव्हतं आणि ईश्वरचरणी काहीही ठेवावं अशी जी समाजधारणा होती ती त्यांना या अर्थानं सोयीची झाली. ईश्वराकडे त्यांनी अभिजनाच्या रूपातच पाहिलं. त्यामुळे अन्य आधाराची त्यांना गरजही वाटली नसावी.

या संत कवयित्रींना अभिप्रेत असलेली समानता फक्त लिंगभेदाचीच नव्हती तर वर्गभेदाची - वर्णभेदाचीही असावी. त्यासाठी त्यांनी शांततेनं जाण्याचा भक्तिमार्ग निवडला. त्यात त्यांचा कोणताही अभिनिवेश नव्हता. मनातला निषेध नोंदवण्याचा ते एक योग्य माध्यम होतं. त्यांचं काव्यलेखन फार अर्थपूर्ण, आशयघन असं होतं. त्यांना अनेक चाहते मिळाले. हे काव्य भक्तीरूपातलं असल्यानं हे चाहते म्हणजेच भक्तपरिवार. असा भक्तीपरिवार निर्माण करण्याचं सामर्थ्य त्या कवयित्रींमध्ये होतं. त्यामुळे त्यांनी स्वत:चं असं स्थान निर्माण केलं होत ते स्पष्ट होतं. संत मुक्ताबाई, संत बहिणाबाई यांना विद्वान वडिलांचा वारसा लाभला होता. संत जनाबाईना मात्र ते भाग्य लाभले नव्हते. पण संत नामदेवांच्या घरात त्यांची आसरण होती. त्यामुळे त्यांचं काव्य ताकदीचं होतं.

'भक्ती ते कठीण, इंगळाची खाई'

भक्तिमार्गाने विठ्ठलाशी अद्वैताचं नातं जोडणाऱ्या जनाबाई भक्तीची वाट किती अवघड आहे हे जाणतात. विठ्ठल हे त्यांचं आराध्य दैवत. त्यांचं तन-मन तिथेच ओढ घेई.

नाव विठोबाचे घ्यावे
मग पाऊल टाकावे
नाम तारक हे थोर
नामे तारिले अपार

आपला भार विठ्ठलावर टाकण्याइतकी अपार श्रद्धा तर त्यांच्याजवळ होतीच. शिवाय 'नामे तारिले अपार'मध्ये त्या स्वतःच्या दुःखमुक्ततेचा हुंकार नोंदवतात.

जनाबाईंना अगदी लहान वयात म्हणजे त्या पाच सहा वर्षांच्या असताना त्यांच्या आईवडिलांनी त्यांना संत नामदेवांच्या वडिलांकडे नेलं. त्या दामाशेट्टींनी आपल्या कन्येवत् लहानग्या जनाबाईला सांभाळलं. दामाशेट्टी विठ्ठलभक्त होते. ते नेमानं पंढरपूरला जात. तेव्हा जनाबाईलाही बरोबर घेऊन जात. जनाबाईलाही विठ्ठलाची ओढ लागली. अशिक्षित असूनही तिला अभंगरचना करता येऊ लागली. जनाबाईला संतपद प्राप्त झालं. बघता बघता जनींची संत जनाबाई झाली. या जनाबाईच्या नावावर तीनशेच्या वर अभंग असल्याचे उल्लेख सापडतात.

'दळिता कांडिता तुज गाईन अनंता'

असं त्या म्हणतात. इतकं तादाम्य पावणाऱ्या जनाबाई अधूनमधून तत्त्वप्रधान अध्यात्माचाही विचार करतात.

सत्व रज तमे असे हे बांधिले
शरीर दृढ झाले अहंकारे
सांडी अहंकार, धरी दृढभाव
हृद्यी पंढरीराव धरूनिया

त्यांनी अतिशय आपुलकीनं विठ्ठलाला 'पंढरीराव' म्हटलंय. या पंढरीरावांचा विरह असह्य झाला की जनाबाई व्याकूळ होऊन म्हणतात,

'वाट पाहते मी डोळा
का गा न येसी विठ्ठला?'

किती आर्ततेने त्या विठ्ठलाला साद घालतात. त्यांना काय सांगायचं असेल विठ्ठलाला? इतर संत कवयित्रींपेक्षा जनाबाईचे आयुष्य वेगळे आहे. तसेच तिच्या समस्याही वेगळ्या आहेत. आपलं शूद्रत्व, दास्यत्व, स्त्रीत्व हे अडसर पार करत तिनं संतत्व प्राप्त केलं. शूद्र जातीची म्हणून तिला मंदिरप्रवेश नव्हता.

'मज ठेवियले दारी, नीच म्हणोनी बाहेरी
मज टाकियले परदेशी, नारा विठा तुजपाशी ।।'

आपली वेदना ती अशी व्यक्त करते. तिचा दबलेला हुंदका शब्दावाटे बाहेर पडतो. ती आळवणी करते. म्हणते -

'तुजवीण रे विठ्ठला, कोणी नाही रे मजला
आपुली म्हणवूनी, आपंगावी दासी जनी ॥'

स्वतःचं एकाकीपणाचं, उपेक्षेचं दुःख हलकं करण्याचा प्रयत्न त्या करतात. आपल्या एकटेपणातलं भय निघून जाण्यासाठी त्या सोबत म्हणून विठ्ठलाला साद घालतात. त्यातूनच अभंगांच्या निर्मितीमुळे जनाबाईंचा प्रवास समान्यत्वाकडून असमान्यत्वाकडे झाला.

संत निर्मळा यांच्या वाट्यालाही उपेक्षित जिणं आलं. संत चोखामेळा यांची ही सख्खी बहीण. त्यांनाही विठ्ठलाचा ध्यास लागला होता. चोखोबांप्रमाणेच निर्मळेलाही समाजाचे चटके सहन करावे लागले. त्यातून निर्माण झालेला प्रपंचाचा वीट तिच्या अभंगातून ठायी ठायी दिसतो. दारिद्र्यानं पिडलेला संसार आणि समाजाकडून होणारी अवहेलना हे तिचं अपार दुःखं होतं. त्यातून 'चहूकडे देवा दाटला वणवा' असा अनुभव तिनं मांडलाय. भौतिक संसाराच तिला आत्यंतिक उबग आला होता. संसारात अणुमात्र सुख नसल्याचा अनुभव ती पचवत चालली होती. या प्रापंचिक चटक्यांमधून मुक्त होण्यासाठी तिनं पांडुरंगाला साकडं घातलं. असल्या त्रस्त करणाऱ्या संसाराचा पाश

विठ्ठलानं तोडावा म्हणून ती आळवणी करत राहिली.

'निर्मळा म्हणे तारा अथवा मारा,
तुमचे तुम्ही सारा बोझे आता'

संत बहिणाबाई या मराठवाड्यातल्या वेरूळजवळच्या देवगाव इथल्या. यजुर्वेदी, देशस्थ ब्राह्मण कुळातल्या. वडील आऊजी कुलकर्णी आणि त्यांचं लग्न रत्नाकर पाठक नावाच्या बीजवर ज्योतिषाशी झालं होतं. दोघांच्या वयात २७ वर्षाचं अंतर होतं. त्यांनाही प्रापंचिक जाच फार होता. दारिद्र्यानं त्यांच्या संसाराला गांजलं होतं. केवळ भक्तिमार्गाकडे वळल्यामुळे त्या ते हलाहल पचवू शकल्या.

'बहिणी म्हणे चित्त कासावीस
संसाराचा त्रास बहु झाला'

बहिणाबाईंचं वेदनागर्भ मन भक्तिरसात गुंतत गेलं. अभंगलेखनानं त्या आपलं मन थोडं मोकळं करत गेल्या. शरीरभोगाबद्दल त्या लिहितात -

स्त्रियेचे शरीर पराधीन देह
न चाले उपाय विरक्ती चा
शरीराचे भोग वाटतात वैरी
माझी कोण करी चिता आता

बहिणाबाईंच्या मनातले असे विचार किती प्रबळ होते, हे यावरून दिसतं. मनाविरुद्ध सोसावं लागण्याची वेदना बोलून दाखवण्याइतका निर्भीडपणा या मनस्विनीजवळ दिसतो. म्हणजे आज स्त्रीमुक्तीच्या संदर्भात, आपल्या मनाविरुद्ध पतीनं शरीरसंबंध केला तर तो बलात्कार समजावा, त्याचा निषेध करावा म्हणून आवाज उठवला जातो, स्त्री-मन सजग केलं जातं. त्याच कृतीची बीजं बहिणाबाईंच्या या निषेधदर्शक भूमिकेत दिसतात. पण तिला तिच्या मनातला हा धगधगता प्रश्न तसाच दाबून ठेवावा लागला. तसाच सोसावा लागला. प्रतिगामी काळाची अगतिकता तिच्यात दिसते.

अशा प्रतिकूल वातावरणामुळे बहिणाबाई प्रपंचाशी कधी मनानं बांधल्या गेल्या नाहीत. त्यांचा हा झगडा खरं म्हणजे प्रपंचाशी आहे म्हणण्यापेक्षा तो स्त्रीत्वाचा झगडा आहे. वयात एवढं मोठं अंतर असलेला, वृत्तीनं तापट, मारकुटा नवरा असेल तर त्यांच्यात कुठून प्रेमभावना निर्माण होणार? आणि जिथे ही प्रेमभावना नाही, तिथे शारीरिक जवळीकही नको ही जाणीव शब्दबद्ध करणारी ही स्त्री म्हणजे क्रांतिकारक संतीणच म्हणायला हवी !

'लादले नरदेह स्त्रियेचेनि रूपे
असंख्यात पापे फळा आली'

आपला स्त्रीदेह हाच बहिणाबाईंना आत्मदोष वाटतो. पुढे त्या म्हणतात -

बहिणी म्हणे ऐसा स्त्रीदेह घातकी
परमार्थ या लोकी केवि साथे
भोगणे न चुके ब्रह्मादिका दु:ख
इतर हे रंक कोण तेथे?
बहिणी म्हणे माझ्या देहाचे प्रारब्ध
ऐसिया गोविंद काय करी?

बहिणाबाईंनी आपले दु:खभोग, देहभोगाची अगतिकता भक्तिरसात डुंबविण्याचा प्रयत्न केला. त्यांचा आत्मविवेक सतत जागा असल्याचं दिसतं. स्वत:ला सावध ठेवत त्या म्हणतात -

विवेक वैराग्य सापडले मज
आता मना तुज कोण पुसे
धरूनी आणीन करीन ध्यानस्थ
होईल तो अस्त इंद्रियांचा

परिस्थितीचं भान त्या सांभाळताना दिसतात. ईश्वरभक्ती हे बहिणाबाईंच्या नीरस जीवनातलं सामर्थ्य ठरतं. प्रपंचाचे चटके खाताना मन विरक्तच होऊन गेलं होतं. मग

आंतरिक समाधानाचं साधन काय, तर ईश्वरभक्ती.

संत कवयित्रींच्या मांदियाळीत संत कान्होपात्रांचा विशेष उल्लेख करायला हवा. कारण अगदी वेगळ्या, समाजबाह्य पार्श्वभूमीवर त्या जन्माला आल्या. संघर्षाच्या फळ्या पाडत पाडत त्या संतपदावर जाऊन पोहोचल्या. त्यांनी संतकाव्यामध्ये मोलाची भर घातली आहे. अप्रतिम लावण्य लाभलेली ही संतीण मंगळवेढ्याची. 'श्यामा' नावाच्या वेश्येची, नृत्यांगनेची ही कन्या. तिनं आत्मोद्धारासाठी भक्तीची वाट धरली. आपलं जन्मगाव मंगळवेढा सोडून ती पंढरीनाथांच्या दारी येऊन विसावली. तिनं पांडुरंगाला जी आर्त साद घातली आहे, त्यानं कोणाचंही काळीज हेलावून जाईल. ती म्हणते -

जीवीचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई
सावळे डोळसे करूणा येऊ दे काही

कान्होपात्राच्या लावण्यावर मोहित होऊन बिदरच्या मोगल सम्राटाचे दूत तिला घेऊन जाण्यासाठी आले. पण तिने पांडुरंगाचा आश्रय घेतला. स्वत:ला बंदिस्त करून घेतलं. आपला देह तिनं विठ्ठलचरणी अर्पण केला. ती भावव्याकुळ होऊन विठ्ठलाला म्हणते,

अगा वैकुंठीच्या राया, आगा विठ्ठला सखया
अगा नारायणा, अगा वासुदेव नंदना
अगा पुंडलिक वरदा, अगा विष्णू तू गोविंदा
अगा रखुमाईच्या कांता, कान्होपात्रा राखी आता

कान्होपात्रेला जे उपेक्षित जिणं जगावं लागलं, त्यातून तिला मुक्तता हवी होती. मुक्ततेचा तत्कालीन मार्ग म्हणजे फक्त भक्तियोग. आपल्याला हीन-दीन आयुष्याचे जे चटके सोसावे लागले, त्या पार्श्वभूमीवर कान्होपात्रेनं करूण शब्दांत म्हटलंय -

दीन पतित अन्यायी, शरण आले विठाबाई
ठाव देई चरणापाशी, तुझी कान्होपात्रा दासी

आपलं पूर्वायुष्य विसरण्यासाठी कान्होपात्रा सतत ईश्वराला विनवणी करत राहिली -

आता पंढरीनाथा नका पाहू अंत
आला तो आघात निवारावा
म्हणोनी कान्होपात्रा येत लोटांगणी
वारंवार विनवणी करीतसे

कान्होपात्रा आयुष्यभर उदासच राहिली. तिला समाधानाचं आयुष्य लाभलंच नाही. तिला असल्या दुखऱ्या जिण्यातून सुटका हवी होती. पण ते तिच्या कपाळी लिहिलं नव्हतं. तिचं विषण्ण मन अगदी टोकावर पाहोचलं ती आत्मशरण होऊन म्हणे -

नको देवराया अंत आता पाहू
प्राण हा सर्वात फुटो पाहे
मोकळोनी आस जाहले उदास
घेई कान्होपात्रेस हृदयात

एकंदरीनं या संत कवयित्रींनी मुक्ततेसाठी अशी भक्तीचळवळ उभी केल्याचं दिसतं. त्यांना आपल्या वेगळेपणाची जाणीव होती. त्यातून त्यांचं स्वत:चं अस्तित्व प्रस्थापित होत गेलं. त्यांचा तसा हेतू नव्हता. त्यांना फक्त आपल्या व्यथेला, आपल्या सोसलेपणाला मोकळी वाट करून द्यायची होती. आपलं गाऱ्हाणं त्या ईश्वरापुढे मांडत गेल्या. म्हणजे अन्यायाविरुद्ध वाच्यता करून अभंगरूपात स्त्रीमुक्तीची बीजंच जणू त्यांनी पेरून ठेवली. त्यातूनच स्त्री-साहित्य उदयाला आलं. स्त्री स्वतंत्रपणे विचार करू शकते, ती ते मांडू शकते. या तिच्या सामर्थ्याचा तो शुभारंभच म्हणायला हवा. कारण त्यांनी अभंगरचना म्हणजे लिखित मराठी स्त्री साहित्याचा महिला फुलोरा म्हणावा लागेल. या अभंगरचनेमुळे रोजच्या रामरगाड्यातून पिचून निघत असतानासुद्धा एक प्रकारची आंतरिक शांती लाभत असावी. त्या ज्या भक्तिरचना करत होत्या. त्यामध्ये दैनंदिन जीवनातील सुख-दु:खं, अडचणी, आघात यांचा अंतर्भाव

असे. ईश्वर हाच दुःखाचा निर्वाहक म्हणून त्यांच्या चरणी त्या आश्रय घेत गेल्या.

या कवयित्रींच्या रचनेत स्त्रित्वाच्या व्यथा अनिवार्यपणे येतात. त्यांना आपल्या घराचा, कुटुंबाचा त्याग करता येत नव्हता. म्हणून आपल्या या बंदिस्त जीवनाला छेद देण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या भक्तिरचनेतून केलेला दिसतो. या भक्तिरचना अत्यंत भावसंपन्न आहोत. यात ईश्वराला उद्देशून वापरलेली स्त्रीसुलभ वेगवेगळी संबोधनं, विशेषणं सुंदर सुंदर प्रतिमांचा वापर हे गुणविशेष दिसतात. आपल्या मनोव्यथा सांगताना त्या आदर्श, शुद्ध, निकोप जीवनपद्धतीचं जणू सूत्रच सांगतात. याचा असा मुळीच अर्थ नाही की, आजच्या स्त्रीवादाच्या संत कवयित्री या प्रत्यक्ष जननी आहेत. काळ आणि काळानुरूप बदलत गेलेल्या स्व-पर जाणिवा लक्षात घेतल्या तर असे म्हणणे केवळ अभिनिवेशापोटी सत्य ठरू शकेल. पण अशा भक्तिमार्गी अद्वैताचे तत्त्वज्ञान सांगतानाही या संतिणींनी आपले स्त्रीत्व जपले, ही मोलाची गोष्ट आहे. मुळात आत्माविष्काराचे त्यांनी दाखविलेले धैर्यच महत्त्वाचे आहे. पुढे बदलत्या कालानुरूप या बिंदूने प्रवाहाचे रूप घेतले. फुले, आगरकर आदींमुळे त्याला प्रवाहाचे रूप प्राप्त झाले. गांधीजींच्या प्रयत्नाने त्याची नदी झाली आणि नंतर आजवर त्याला सागराची तात्त्विक खोली वा विस्तार प्राप्त झाला. हा एका दृष्टीने स्वत:च्या स्वतंत्र अस्तित्वाच्या शोधाचा, आत्मसामर्थ्याच्या जाणिवेपर्यंतचा विस्तारच म्हणता येईल. त्याचे विवरण करताना अप्रत्यक्ष आद्यबिंदू असणाऱ्या संत-कवयित्रींचा विसर पडू नये यासाठी हा प्रयत्न !

**गीतेश गजानन शिंदे**
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी - २५३७९५१९

## परिसर वार्ता

### अभियंतादिन

भारतरत्न विश्वेश्वरखा यांच्या स्मरणार्थ १५ सप्टेंबर हा दिवस अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनात 'लॉकिम'मधील सीओओ श्री. उदय निरगुडकर यांचे 'राष्ट्रउभारणीत अभियंत्यांचे योगदान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. श्री. निरगुडकर यांनी आपला मंत्रमुग्ध करणाऱ्या भाषणात स्वत:च्या अनुभवांसह जगप्रसिद्ध बांधकामे करण्याचा अभियंत्यांती कौशल्यांचा उल्लेख केला. त्यांची ही कौशल्ये म्हणजे अभियांत्रिकीचा मानवी संस्कृतीतील सर्वोत्तम आविष्कार आहे असे त्यांनी सांगितले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणाऱ्या प्राचार्य डी.के.नायक यांनी कर्नाटकातील विश्वेश्वरय्या यांनी उभारलेल्या प्रकल्पाबाबत माहिती दिली. कार्यक्रमास वायू.एस्.टी.ह. ॲप्टरच्या प्रमुख सौ.ए.एस्. दिवारकर यांच्यासह अनेक शिक्षक व सुमारे ३०० विद्यार्थी उपस्थित होते.

दिशा
नियमित
वाचा

# साहित्यजगत

## विनोदी लेखक वि.आ.बुवा यांचे ७९ व्या वर्षात पदार्पण

सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्री. विनायक आदिनाथ बुवा यांनी ४ जुलै २००४ रोजी ७९ व्या वर्षात पदार्पण केले आहे. ४ जुलै १९२६ रोजी पंढरपूर येथे त्यांचा जन्म झाला. पंढरपूर व मिरज येथे त्यांचे शिक्षण झाले. मुंबईतील व्ही.जे.टी.आय या तांत्रिक महाविद्यालयात संपूर्ण काळ नोकरी करून १९८६ साली ते सेवानिवृत्त झाले.

### १९५१ पासून लेखनास प्रारंभ

१९५० च्या आधी त्यांनी 'इंदुकला' हा हस्तलिखित अंक काढला. श्री. बुवांचे हस्ताक्षर सुंदर आहे. या हस्तलिखित दिवाळी अंकाचं वैशिष्ट्य म्हणजे अनंत काणेकर, महादेव शास्त्री जोशी, चिं.वि.जोशी, दुर्गा भागवत आदि अनेक मान्यवरांचे साहित्य या अंकात होते. स्वा. सावरकर, सेनापती बापट, आचार्य अत्रे, पा.वा.गाडगीळ, ग.त्र्यं. माडखोलकर इ. थोरामोठ्यांचे त्यांच्या हस्ताक्षरातले चांगले अभिप्राय या अंकांना लाभले. प्रभाकर पाध्ये यांच्यासारख्या चोखंदळ, अभ्यासू विचारवंत साहित्यिक व पत्रकाराने बुवांमधला स्पार्क ओळखून त्यांच्याकडून नवशक्ती दैनिकासाठी आवर्जून लेखन मिळविले. नवशक्तीतील या लेखनामुळे लेखनास प्रारंभ झाला. १९५३ साली 'अकलेचे तारे' हे त्यांचे पहिले विनोदी पुस्तक प्रसिद्ध झाले. मे २००० पर्यंत त्यांची १३० पुस्तके प्रसिद्ध झाली. आणखी दहा-पंधरा प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. ही सर्व पुस्तके विनोदी आहेत. विनोदी साहित्यातील हा विक्रम आहे. मुंबई आकाशवाणीवर ६०० हून अधिक कार्यक्रमांसाठी त्यांनी लेखन केलेले आहे. पुण्याच्या दिलीपराज प्रकाशनाने त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित केलेली आहेत.

### व्याख्याने, कथाकथनाचे शेकडो कार्यक्रम

या कार्यक्रमांनिमित्त महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरही त्यांनी शेकडो दौरे केले. अनेक नियतकालिकांतून वर्षानुवर्षे त्यांनी स्तंभलेखन केलेले आहे अशा लेखांची संख्या हजाराहून अधिक आहे. मुद्रित पानांच्या हिशोबाने सांगावयाचे झाल्यास आजवर त्यांनी सुमारे ३०००० (तीस हजार) पाने भरतील इतके साहित्य लिहिले आहे. 'प्रेमाची एस्सो स्टाईल' या पुस्तकाच्या निमित्ताने त्यांना महाराष्ट्र शासनाकडून विनोदी साहित्याचा प्रथम पुरस्कार मिळाला. इतरही अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. अनेक नामवंतांनी त्यांना लेखनाबद्दल वेळोवेळी शाबासकी दिली आहे. महाराष्ट्रातल्या अनेक प्रकाशकांनी त्यांची पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. लेखन आणि वाचन हे दोन त्यांचे मुख्य छंद आहेत. संस्कृत भाषा, संतसाहित्य, अध्यात्म, तत्त्वज्ञान, धार्मिक साहित्य यांच्या वाचनात त्यांना विशेष रस आहे. भविष्यकाळातही भरपूर लेखन करण्याचा त्यांचा मानस आहे. ७९ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

## विज्ञान लेखक श्री. गजानन वामनाचार्य नाबाद ७०

सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ, विज्ञान लेखक आणि घाटकोपर (मुंबई-७५) येथील तळमळीचे समाज कार्यकर्ते श्री. गजानन वामनाचार्य ('सोनमोहर', १८०-४९३६, पंतनगर, घाटकोपर-पूर्व, मुंबई - ४०० ०७५) यांनी ३ मे २००४ रोजी ७१ व्या वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने त्यांचे स्वकीय, मित्रमंडळी आणि हितचिंतकांनी त्यांचा अेक हृदय सत्कार केला.

### कुशल संशोधक

वामनाचार्य मुंबईच्या भाभा अणुसंशोधन केंद्राच्या किरणोत्सारी अेकस्थे आणि विकिरण तंत्रज्ञान विभागात

सदतीस वर्षे अणुसंशोधन अधिकारी या पदाचा कार्यभार सांभाळून साठाव्या वर्षी (१९९४) निवृत्त झाले. अमेरिकेतील ओकरीज नॅशनल प्रयोगशाळेत, किरणोत्सारी अेकस्थांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि वितरण याविषयी त्यांनी खास प्रशिक्षण घेतले होते. ह्याच प्रयोगशाळेत हिरोशिमा आणि नागासाकी येथे टाकलेल्या अणुबॉम्बचे अिंधन म्हणजे प्लुटोनियम आणि संबंधित युरेनिअम २३५ निर्माण केले होते.

तुर्भे येथील अप्सरा, सायरस आणि ध्रुव या भारतीय अणुभट्ट्यातून वैद्यक, उद्योग आणि कृषी क्षेत्रात वापरली जाणारी किरणोत्सारी अेकस्थे निर्माण करणे, ती शुद्ध स्वरूपात अलग करणे, सीलबंद स्वरूपात त्याचे अुद्‌भव निर्माण करणे, अमोरिशियम-२४१ हा अल्फाकर्णोत्सारी अेकस्थ वापरून, आगीची पूर्वसूचना देणारे स्वयंचलित उपकरण तयार करणे वगैरे बाबतीत वामनाचार्यांचे संशोधन फार मोलाचे ठरले आहे. अप्सरा अणुभट्टीत गंधकाच्या भुकटीवर न्यूट्रॉनांचा मारा करून फॉस्फोरस-३२ हा भारतीय बनावटीचा पहिलाच किरणोत्सारी अेकस्थ निर्माण करण्याचे बरेचसे श्रेय श्री. वामनाचार्यांना आहे. अणुबॉम्बमध्ये लागणारा न्यूट्रॉन अुद्‌भव तयार करणे आणि हैड्रोजन बॉम्बला लागणाऱ्या लिथियम-ट्रिटीयम कवचावरील संशोधनातही श्री. वामनाचार्यांचा थोडा सहभाग आहे.

**विज्ञानाचा प्रचार आणि प्रसार**

मराठी विज्ञान परिषदेचे ते प्रथमपासूनचे (१९६६) आजीव सभासद आहेत. परिषदेच्या ध्येय धोरणानुसार विज्ञान प्रचार आणि प्रसाराचे कार्य ते सतत करत असतात. मराठी विज्ञान परीक्षांच्या अभ्यासक्रमात 'दैनंदिन व्यवहार विज्ञान' ह्या विषयावर त्यांनी सहा प्रकरणे मराठीत लिहिली आहेत. ते मराठी विज्ञान परिषद पत्रिकेच्या संपादक मंडळाचे १९९८ पासून सदस्यही आहेत. अमृत, किर्लोस्कर, स्त्री, प्रेरक, ललकारी, सृष्टिज्ञान, मराठी विज्ञान परिषद पत्रिका, शिक्षण संक्रमण (पुणे) मासिकात आणि महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, नवशक्ती, तरुण भारत वगैरे दैनिकांतून त्यांनी विज्ञानविषयक विपुल लेखन केलेले आहे. आकाशवाणीवर ज्ञानविज्ञान आणि परिसर पर्यावरण ह्या भाषणमालिकात त्यांची सुमारे १० भाषणे प्रक्षेपित झाली आहेत. अनेक सामाजिक संस्थात प्रासंगिक भाषणे त्यांनी दिली आहेत. आडनावांच्या नवलकथा, विज्ञान आणि अध्यात्म, योगाभ्यास, घरगुती कचरा व्यवस्थापन वगैरे विषयावर केवळ समाज प्रबोधनासाठी त्यांनी अनेक व्याख्याने दिली आहेत.

**सामाजिक कार्यकर्ता**

सामाजिक घडामोडींबद्दल आपली मते जनतेला कळवून सामाजिक समस्यांना वाचना फोडण्याचे एकमेव साधन म्हणजे वृत्तपत्र लेखन. विविध दैनिकांतून अशी त्यांची सुमारे तीनशे पत्रे प्रसिद्ध झाली आहेत. (१९५४ साली कॉलेजात असताना त्यांचे पहिले पत्र नागपूर टाइम्समध्ये प्रसिद्ध झाले होते.) अनेक सामाजिक संस्थांना सहकार्य देऊन, विज्ञान प्रबोधन, पर्यावरण, नैसर्गिक संपत्तीचे संवर्धन, जागतिक वसुंधरा दिन, जागतिक पर्यावरण दिन, घरगुती कचरा सुव्यवस्थापन वगैरे बाबतीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे.

**बाळ गोजिरे नाव साजिरे**

नवजात बालकाचे नाव काय ठेवायचे हा प्रत्येक कुटुंबातील मोठा कुतूहलाचा व आनंदाचा प्रसंग म्हणून त्यांनी मुलामुलींच्या सोळा हजार प्रचलित नावाचा (भारतातल्या प्रत्येक प्रांतातील नावांचा त्यात समावेश आहे) संग्रह असलेले 'बाळ गोजिरे नाव साजिरे' हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले आहे. सुमारे पन्नास हजार मराठी आडनावे असलेला 'आडनाव कोश', 'अिडिया, भारत आणि हिंदुस्थान', 'वाचणारा लिहितो' ही त्यांची तीन पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

**हृद्य सत्कार**

३०.५.२००४ रोजी झालेल्या सत्कारास त्यांचे

कुटुंबीय आणि मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह अ.पां.देशपांडे, म.वि.परिषदेच्या अिशान्य मुंबई विभागाचे अध्यक्ष वि.वि.देशपांडे ज्येष्ठ नागरिक संघटने(फिस्कॉम)चे प्रतिनिधी अशोक देशपांडे, ज्येष्ठ नागरिक संघ (घाटकोपर)चे कार्यवाह तुकाराम कोकीळ, समर्थ सेवा संघाचे कार्यवाह श्रीकृष्ण कुलकर्णी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय (पंतनगर, घाटकोपर) शाखेच्या विश्वस्त मंडळाचे आणि कार्यकारिणीचे सर्व सभासद आणि कर्मचारी मंडळी सत्कार समारंभास उपस्थित होती. अनेक मान्यवर मंडळींची वामनाचार्य यांचा गौरव करणारी भाषणे झाली. सत्कारास उत्तर देताना ते म्हणाले, 'आपले कुटुंबीय आणि मित्रमंडळी यांच्या सहकार्याशिवाय कोणालाही यशस्वी होता येत नाही आणि म्हणूनच त्या सर्वांचा मी सदैव ऋणी आहे.'

## 'गीताई' आणि गीताप्रवचने

श्रेष्ठ संत विनोबा भावे लिखित 'गीताई' हा मराठी भाषेतील एक चमत्कार आहे. 'गीताई' हा संस्कृत भगवद्गीतेचा प्रासादिक पद्यानुवाद तर आहेच. शिवाय ती गीतेवरील भाष्य देखील आहे. संस्कृत गीतेतील धर्म-विचार 'गीताई' सर्वजण सुलभ केला आहे. 'गीताई'ला विनोबांनी आपल्या जीवनातील सर्वांत मोठी उपलब्धी मानावे त्यांनी म्हटले होते. 'बाबा (विनोबा) जाईल, गीताई राहील. विनोबाला विसरा, गीताईचा करता येईल तेवढा प्रचार करा.' गीताईचा मराठी भाषिकात सर्वत्र प्रसार व्हावा अशी विनोबांची तळमळ होती. आजच्या काळासाठी 'गीताई' हा निर्दोष, सर्वग्राह्य व्हावा असा धर्मग्रंथ आहे.

या 'गीताई'च्या जन्माला २००५ साली ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. आजवर त्याच्या सुमारे ६९ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून लक्षावधी प्रती संपल्या आहेत. 'गीताई'ची इतर भाषांतूनही अनुवाद झालेला आहे. लहान आकारातील (३.५× ५ इंच) गीताईचे मूल्य रु. ५ आहे. मोठ्या आकारातील (ठळक टाईप - ५×७.५ इंच) 'गीताई'चे मूल्य रु. ८/- आहे. याशिवाय संस्कृत गीता व गीताई एकत्रही छापली आहे. ('गीता-गीताई', त्याचे मूल्य आहे रू. १५/-) या दोन्ही पुस्तकांबाबत विनोबा म्हणत, 'माझा विश्वास आहे की जग माझी अन्य सेवा किंवा कृती विसरले तरी 'गीताई आणि गीता प्रवचने' कधी विसरणार नाही आणि माझी ही कृती जगाची सेवा करीत राहील.'

**गीता प्रवचने**

धुळे तुरुंगात १९३२ मध्ये विनोबांनी गीतेवर दिलेली ही प्रवचने साने गुरुजींसारख्या सत्पुरुषाने लिहून घेतली. गीतेवरील साहित्यातच नव्हे तर जगातील आध्यात्मिक साहित्यात अद्वितीय स्थान असलेल्या या ग्रंथाने आजवर हजारो लोकांना जीवनाची दिशा दाखवली आहे, जीवनशुद्धीची प्रेरणा दिली आहे. या ग्रंथाच्या आत्तापर्यंत ३,७४,००० प्रतींची विक्री झाली आहे. दरवर्षी हा आकडा वाढतच आहे. बहुतेक सर्व भारतीय भाषांत व अनेक विदेशी भाषातही (एकूण २३ भाषांत) याचे भाषांतर झाले असून २५ लाखांहून अधिक प्रती प्रकाशित झाल्या आहेत. (मराठीतील ३९ व्या आवृत्तीची, पृष्ठे २५६ असून मूल्य अवघे रु. २०/- आहे.) इंग्रजीत हा ग्रंथ 'टॉक्स ऑन गीता' (पृ. २८०, मूल्य रु. ६०/-) या नावाने प्रसिद्ध झाला आहे. मराठी व इतर भाषांतील भाषांतराची पुस्तके परंधाम प्रकाशनाने (पवनार, जि. वर्धा - ४४२१११, दूरध्वनी - ०७१२-२८८०४०) प्रकाशित केली आहेत. (संस्कृतमध्येही गीता प्रवचने एव्हाना प्रसिद्ध झाली असावीत.) 'गीता प्रवचने ही माझ्या जीवनाची गाथा आहे आणि तोच माझा संदेश आहे' असे विनोबांनी सांगितले आहे. इतरही अनेक महत्त्वाची, उत्तम संस्कार करणारी पुस्तके परंधाम प्रकाशनाने प्रकाशित केलेली आहे. जिज्ञासूंनी त्यांच्याशी अवश्य संपर्क साधावा.

- शरद जोशी, ग्रंथप्रसारक, डोंबिवली

# २००४ वैज्ञानिक जागृकता वर्ष

*भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने हे वर्ष वैज्ञानिक जागृकता वर्ष असे जाहिर केले आहे. - संपादक*

या अंतर्गत भागा अणुसंशोधन केंद्र (BARC) आणि टाटा मुलभूत संशोधन केंद्र (TIFR) ह्या संस्थावर ही कामगिरी सोपवली आहे. त्याला सायन्स स्क्वेअर असे नाव देण्यात आले आहे व संशोधनाची आवड निर्माण करण्याचा एक अभिनव प्रकल्प असे म्हटले आहे.

या प्रकल्पांसाठी डॉ. श्रीधर मनोहर भाभाचे वैज्ञानिक हे मुख्य संयोजक आहेत. महाराष्ट्रासाठी ठाण्यातील जिज्ञासा ट्रस्टचे प्रमुख श्री. सुरेंद्र दिघे हे प्रमुख संयोजक आहेत.

या प्रकल्पांसाठी मुंबईतील ५ महाविद्यालयांची निवड करण्यात आली आहे. रुईया महाविद्यालय माटुंगा, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, चेंबूर, वझे केळकर महाविद्यालय, मुलुंड, मॉडर्न महाविद्यालय, वाशी आणि आपले बा.ना.बांदोडकर७ विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

या कार्यक्रमांच्या सुरुवातीला BARC च्या दोन वैज्ञानिकांना आमंत्रित करण्यात आले होते. हा कार्यक्रम २५ जून, शुक्रवार २००४ रोजी आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. शरद काळे हे BARC मध्ये गेली ३० वर्षे कार्यरत आहेत. ते अणू, शेतकी व जैवतंत्रज्ञान या विभागात आहेत. त्यांच्या नावे अनेक प्रकल्प आहेत. त्यातील सध्या चालू असलेला एक प्रकल्प म्हणजे 'निसर्गऋण' : आपला निसर्ग हा आपल्याला सर्व काही मिळवून देतो, याची आठवण ठेवून या निसर्गाचे संगोपन करणारा प्रकल्प. या प्रकल्पाद्वारे त्यांनी मुंबईत ५ बायोगॅस प्लान्टस् उभारले आहेत. यामध्ये घनकचरा विघटन करून वायू मिळवला जातो. या वायूचा उपयोग स्वयंपाक घरात इंधनासाठी आणि विजेची निर्मिती करण्यासाठी होऊ शकतो.

डॉ. श्रीधर मनोहर हे BARC मध्ये गेले ३७ वर्षे कार्यरत होते. ते रसायन विभागाचे प्रमुख होते आणि आधुनिक Nuclear रसायन शास्त्रावर त्यांचे प्रभुत्व आहे. स्त्रोत किरणे, उत्सर्जन यावर त्यांचा विशेष अभ्यास आहे.

आपल्या भाषणात डॉ. काळे यांनी मुलांना आपली चौकस बुद्धी जागरूक ठेवण्याची विनंती केली. कोणत्याही क्षेत्रातील लहान प्रकल्प घेण्याचे आव्हान केले. यासाठी त्यांनी खेड्यातील एका शाळेचे उदाहरण दिले. ते म्हणाले, खेड्यातील एका शाळेत मधल्या सुट्टीत फळे वाटण्यात आली. मुलांनी ती फळे खाऊन साले तिकडेच कोपऱ्यात टाकली. मधली सुट्टी संपली आणि तास सुरू झाला. गुरूजी शिकवायला आले. ते अतिशय निष्णात होते. शिकवत असताना त्यांच्या असे लक्षात आले की पहिल्या बाकावर बसलेल्या मुलीचे त्यांच्याकडे अजिबात लक्ष नाही. ती कोपऱ्यात पडलेल्या त्या घाणीच्या ढिगाऱ्याकडे पाहत होती. गुरूजींनी रागावून तिला विचारले, 'का गं, माझ शिकवण काय इतकं टाकावू आहे की तू त्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याकडे पाहते आहेस.' ती प्रथम घाबरली. पण मग हळूच म्हणाली, 'तुम्ही त्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याकडे पाहिलेत का? तिकडे माश्या या सगळ्या सालींवर बसत आहेत पण सीताफळावर नाही बसत काय कारण असेल? आता गुरुजींची नजरही त्या कचऱ्याच्या ढिगाकडे गेली आणि ते ही विचार करू लागले. त्यांनी तसाच प्रयोग पुन्हा प्रयोग शाळेत करून पाहिला तेव्हा पुन्हा एकदा तेच दृश्य नजरेस पडले. त्यांनी मग सीताफळाच्या सालीचे विश्लेषण केले आणि त्यामधून एका नवीन तऱ्हेच्या शर्करेचा शोध लागला आणि त्याचे पेटंट त्या चिमुरडी

मुलीला मिळाले. हे ध्यानात ठेवून आपल्या विद्यार्थ्यांनी आपल्या आजूबाजूला होणाऱ्या दैनंदिन घटना लक्षात घेऊन जर वैज्ञानिक प्रकल्प केले तर ह्या कार्यक्रमाचे सार्थक होईल.

ह्या प्रकल्पांमध्ये BARC व TIFR या दोन्ही संस्था आपल्याला मदत करणार आहेत आणि विशेष मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी महिन्यातून एकदा तिसऱ्या शनिवारी व्याख्यान आयोजित करण्यात येईल. आपल्या आवडेल तो व जाणून घ्यायची उत्सुकता असेल तो विषय आपण निवडायचा आहे त्याप्रमाणे व्याख्यान आयोजित करण्यात येईल.

**प्रा. सौ. एम्.यु. बोरकर**
को-कॉरडिनॅटर-सायन्स स्क्वेअर,
बी.एन्. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन शनिवारी झाले. सुप्रसिद्ध पत्रकार आणि मुलाखतकार राजु परुळेकर यांच्या हस्ते हे उद्‌घाटन झाले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री.वि. करंदीकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा. मोहन पाठक यांनी केले तर प्रभारी प्राचार्या सौ. माधुरी पेजावर यांनी या अभ्यासक्रमाविषयी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी वर्गाचे अध्यापक शशिकांत कोठेकर, डॉ. सुधीर मोंडकर, अरविंद विंझे आणि रविंद्र मांजरेकर उपस्थित होते. शरद लळित यांनी आभार प्रदर्शन केले. पत्रकार राजु परुळेकर यांनी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आदर्श पत्रकारितेविषयी मार्गदर्शन केले.

(मुखपृष्ठ २ वरून)

**सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल यांनी आयोजित केलेले अभ्यासाला पूरक ठरतील असे व अभ्यासेतर उपक्रम.**

५. इ. ९ वी, १०वी साठी स्वाध्याय परिवारातर्फे पथनाट्य

६. इ. १०वीसाठी खरे गुरूजी यांचे संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन

७. इ. ६वी – अथर्वशीर्ष आवर्तने.

८. इ. १०वी – पनवेल जवळ नेरे या गावी समाजसेवा व भूगोल विषयांसाठी अभ्यास दौरा.

९. पाण्यापासून विजनिर्मितीचा प्रकल्प पाहण्यासाठी १६ विद्यार्थ्यांची शहापूर येतील घाटघर प्रकल्पाला भेट.

१०. औषधी वनस्पति, फुलपाखरांच्या विविध जाती इ. निसर्ग अभ्यासासाठी ३० विद्यार्थ्यांच्या गटाची ठाणा कॉलेजला भेट

११. इ. ८ वी, ९ वी च्या विद्यार्थ्यांची होमी भाभा सायन्स सेंटरला भेट

१२. इ. ७ वी – N.A.B. Workshop भारत की खोज या शीर्षका अंतर्गत इतिहासाशी संबंधित चित्रांचे प्रदर्शन, वरळी दूध डेअरी येथे दूध बाटलीत व प्लॅस्टिक बॅगेत भरण्याच्या प्रक्रियेला भेट.

१३. इ. ७ वी येऊर येथे कॅम्प.


१४. २८ ऑगस्टला संस्कृत दिवस, ४ सप्टेंबरला शिक्षक दिन व १४ सप्टेंबरला हिंदी दिवस शाळेत साजरा केला गेला.

**दिशा**
**नियमित वाचा**

# 'सायन्स स्क्वेअर संशोधन' वृत्त वाढविण्याचा एक अभिनव प्रकल्प

*रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. संदीप पांडे यांना बांदोडकर महाविद्यालयात परिसंवाद कार्यक्रमासाठी आमंत्रित केले होते. हा कार्यक्रम १ जुलै २००४ गुरुवार रोजी संपन्न झाला त्यासंबंधी - संपादक*

डॉ. संदीप पांडे यांना मॅगसेसे पुरस्कार २००२ साली Emergent leadership या सदराखाली देण्यात आला. हा पुरस्कार त्यांच्या गरीब व गरजू लोकांची अविरत सेवा करण्याबद्दल देण्यात आला. त्यांनी 'आशा' ही संस्था स्थापून त्याच्या जवळ जवळ ३७ शाखा परदेशी व भारतात उभारल्या आहेत.



रॅमन मॅगसेसे पुरस्कार हा नोबेल प्राइजच्या तोडीचाच, परंतु आशियायी खंडात दिला जातो. हा पुरस्कार लोकाची अविरत निस्वार्थी सेवा करणाऱ्या एखाद्या व्यक्तीला वा संस्थेला प्रदान केला जातो.

डॉ. संदीप पांडे यांचे प्रथम शिक्षण हे बनारस हिंदू विद्यापीठात झाले. त्यानंतर ते पुढील शिक्षणासाठी परदेशात गेले. तेथे बर्कले या प्रतिष्ठित विद्यापीठात त्यांना प्रवेश मिळाला. येथे त्यांनी इंजिनियरींगची पदवी मिळवली आणि इथेच त्यांनी ह्या संस्थेची स्थापना केली. या कार्यासाठी त्यांनी जवळ जवळ १० लाख डॉलर्सचे अनुदान दिले आहे.

डॉ. संदीप पांडे म्हणतात, शिक्षणाची, महत्त्वाची दोन मूल्ये आहेत. एक म्हणजे स्वावलंबन आणि दुसरे सामाजिकता. ते महात्मा गांधीचे अनुयायी आहेत. ते म्हणतात, 'एकदा वाटचालीचा आराखडा बांधला की साधने आपोआप समोर येतात.'

सद्या डॉ. संदीप पांडे हे बालिया आणि लालपूर या दोन ठिकाणी आशा आश्रमाचे संचालकाचे काम पाहत आहेत.

डॉ. संदीप पांडे बरोबरच्या परिसंवाद हा सायन्स स्क्वेअरच्या अंतर्गत घेण्यात आला होता. ते अस्खलित हिंदीत बोलले. ते म्हणाले की, माणूस हा सहा स्तरांवर जगतो. स्वयं (चैतन्य), शरीर, परिवार, प्रकृती आणि अस्तित्व, परंतु मनुष्याला या सर्व स्तरांमध्ये समतोल राखता यायला पाहिजे तरच व्यक्ती आणि समाज समृद्ध होतो. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना विश्व शांतीसाठी झटण्याचे आव्हान केले आणि विज्ञानाचा वापर हा मनुष्याच्या योग्य त्या कामी येण्यासाठी करावा न की त्याच्या ऱ्हासाकरिता असे सांगितले.

**प्रा. सौ. एम्.यु. बोरकर**
को-कॉरडिनॅटर-सायन्स स्क्वेअर,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे.

# ''सृष्टी''

## बॉटनी क्लब प्रदर्शन (३०,३१ जुलैं व १ ऑगस्ट ०४)

परिसरवार्ता असा वेगळा भाग न करता परिसरातील एका प्रदर्शनाचा विद्यार्थ्यांच्या भाषेतील हा वृत्तांत
*- संपादक*

वर्तमान काळात प्रत्येक माणसाचं जीवन हे एकसुरी झाले आहे, तसंच आम्हा विद्यार्थ्यांच ! अभ्यासातला एकसुरीपणा कमी करण्यासाठी आमचं वनस्पतिशास्त्र विभाग गेली दोन वर्ष ''सृष्टी'' क्लब अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करते. ''सृष्टी'' चा महत्वाचा कार्यक्रम म्हणजे प्रदर्शन ! निसर्गाच्या विविध कार्याचे शास्त्रीय दृष्टीकोनातून प्रदर्शन भरवून सर्वांना निसर्ग हे आपल्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे हे दाखवून दिले जाते.

अशा ह्या तृतीय वर्षातल्या ''सृष्टी क्लब'' ची पहिली सभा दि. ७ जुलैला घेण्यात आली. यात नवीन कार्यकारिणी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आली. सचिव-कुमोद पुरी, सहसचिव - अमित भोईर, खजिनदार-नीता वाघ यांची निवड झाली. त्यानंतरच्या दोन दिवसांत सृष्टी चे सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सभासदत्व १००रु. वर्गणी देऊन प्राप्त केले. खरं तर ह्या विद्यार्थ्यांची संख्या नेहमीप्रमाणे जास्त असल्याने आम्हा सर्वांचा उत्साह आणखीनच वाढला. त्यानंतर सर्वानुमते १८ विषयांवर प्रदर्शन भरावयाचे ठरवले. प्रत्येकजण सखोल पण सर्वांना समजेल ह्यासाठी आपपल्या विषयावर माहिती गोळा करु लागले. विशेष म्हणजे कॉलेजच्या वेळेत सर्व प्रॅक्टीकलस् व लेक्चर्स अ‍ॅटेंड करून अगदी उत्साहात, हसत खेळत संध्याकाळी ७ वाजेपर्यंत प्रदर्शनाची तयारी करु लागलो प्रदर्शनाचे उद्घाटन ३० जुलैला असल्याने २९ तारखेपर्यंत प्रदर्शनाची बहुतांशी तयारी झाली होती. कॉलेजच्या सर्व विभागांना निमंत्रणे देऊन झाली होती. अखेर आम्ही ज्या दिवसाची वाट पहात होतो तो दिवस उजाडला.



**दीप प्रज्वलन करुन उद्घाटन करताना प्राचार्य स. वा. गोखले व प्रभारी प्राचार्य सौ. माधुरी पेजावर. उजवीकडे - प्रा. पोद्दार व डावीकडे दर्शना व प्रगती.**

दिनांक ३० जुलै २००४, शुक्रवारी सकाळी ११ वाजता आमच्या 'सृष्टी' प्रदर्शनाचे उद्घाटन जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. स. वा. गोखले यांच्या शुभहस्ते सरस्वती समोरील दीप प्रज्वलन करुन झाले. प्रमुख पाहुण्यांसोबत व्यासपीठावर आमच्या सायन्स कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर मॅडम आणि उपप्राचार्या प्रा. अकोलकर मॅडम तसेच सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते. ह्या सर्व उपस्थितांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांची ओळख आमच्या विभागाचे डॉ. कोलेट सर यांनी करुन दिली. त्यांतर सत्काराचा कार्यक्रम झाला. त्यात डॉ. टेकाळे, डॉ. कोलेट, डॉ. सौ. सहा, डॉ. आठले आणि डॉ. सौ. बोरकर ह्या सर्व प्राध्यापकांचा पाहुण्यांच्या हस्ते

पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. त्यांना मिळालेली डॉक्टरेट पदवी आणि त्यांच्या बहुमोल कार्याचा आढावा विभागाच्या प्रमुख डॉ. सौ. मुळगांवकर मॅडम यांनी घेतला. त्यावेळेस स्वागतपर गीत प्रगती व दर्शनाने गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. स्वागतपर भाषण फौजिया, 'सृष्टींची माहीती कहुं तर आभारप्रदर्शन क्लबचे सचिव कुमोद ह्या सर्वांनी केले. प्रदर्शनातील उद्घटनापासून तर शेवटच्या दिवसापर्यंत डॉ. टेकाळे सरांनी महत्त्वाचे, सुंदर क्षण आपल्या कॅमेऱ्यात टिपले.

प्रदर्शन विविध विषयांवर भरवले होते ते पुढीलप्रमाणे-

**✣ वनस्पतिशास्त्रातील संधी**

प्रदर्शनात सुरुवातीला अमित आणि दिप्ती यांनी वनस्पतिशास्त्राची व्याप्ती किती मोठी आहे आणि भविष्य उज्ज्वल करण्यासाठी खूप संधी आहे हे दाखविण्यासाठी एक मॉडेल तयार केले होते. ह्या द्वारे प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या मुलांना वनस्पतिशास्त्राची शास्त्रीय आणि परिपूर्ण माहीती मिळाली.

**✣ फायटोकेमिकल्स**

आपण नेहमीच्या वापरात फळे आणि भाजीपाला वापरतो, त्यात अनेक प्रकारची कर्करोगनाशक, सुक्ष्मजंतूनाशक तसेच हृदयविकार कमी करणारे इतर रसायने म्हणजेच फायटोकेमिकल्स असतात याची जाणीव आकर्षक चार्टद्वार कुमुद आणि विनिता यांनी सर्वांना करुन दिली.

**✣ सिंथेटिक सीडस् - आपलं भविष्य**

आजचा जमाना हा 'बायोटेक्नॉलॉजीचां' आहे. ''सिंथेटिक सीडस्' ह्या संशोधनात तसेच कृषीक्षेत्रात किती महत्वाच्या आणि फायदेशीर आहेत हे फोटोच्या माध्यमातून शैलजा आणि वैजयंती यांनी दाखवण्याचा प्रयत्न केला. यामुळे सीडस् पासुन वनस्पती कशी उगवते हे सर्वांना समजते तसेच ह्या सिंथेटिक सीडस् कशा असतात हे प्रत्यक्ष पहायला मिळाले.

**✣ परिसरातील झाडे**

प्रदर्शनातील आकर्षणाचा केंद्रबिंदू होता तो म्हणजे आमच्या संपूर्ण विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व कॉलेज कॅम्पसचे मॉडेल. ह्या मॉडेलमध्ये कॅम्पसमधील सर्व झाडांच्या प्रतिकृती उभारुन त्यांचा वनस्पतिशास्त्रीय स्वरुपात दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी आधी सर्व मुलांनी संपूर्ण कॅम्पसच्या परिपूर्ण अभ्यास केला. त्या मॉडेलसाठी ललित आणि स्वप्नील यांनी एके दिवशी तर पहाटे चार वाजेपर्यंत काम केले. संपूर्ण मॉडेलसाठी ह्या दोघांना पुनम आणि नीता ह्या दोघींनी मदत केली.

**✣ वसस्पतींचा संग्रह**

वनस्पतिशास्त्रात अनेक प्रकारच्या झाडांचे शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी हर्बेरियम शीटस् तयार करण्यात येतात. ह्या हर्बेरियम शीटस् शायजी आणि प्रगती यांनी आकर्षक पद्धतीने तयार करुन त्या कशा तयार करतात हे सर्वांना समजावून सांगितले. ह्या शास्त्राचा संबंध नसणाऱ्यांना शीटस् खुप सुंदर आणि उपयुक्त वाटल्या.

**✣ वनस्पतिशास्त्राचे ग्रंथ**

वनस्पतिशास्त्रातले 'कुकस्' ह्या शास्त्रज्ञाचे महान ग्रंथ किती उपयुक्त आणि अभ्यासपुर्ण आहेत हे शायजी आणि प्रगती यांनी सर्वांना सांगितले.

**✣ खारफुटीचे महत्त्व**

आज पर्यावरण संतुलनात खारफुटीचे महत्त्व स्पष्ट झाले आहे. हे खारफुटीचे महत्त्व अतिशय सुंदर मॉडेल बनवून सर्वाना समजावून दिले प्रफुल्ल आणि मनाली, गौरी,

गीतांजली आणि निशीगंधा यांनी ह्या सर्व मुली प्रथम वर्षाच्या असुनसुद्धा त्यांचा उत्साह हा कौतुक करण्यासारखा होता.

### ❖ खाद्यपदार्थांवर वाढणारे रोगजंतु

खाद्यपदार्थांवर रोगजंतु का व कसे वाढतात व त्यापासुन कशा प्रकारे सावधगिरी बाळगुन साध्या उपाययोजना करुन अनेक झाडाचे बोन्साय शास्त्रीय पद्धतीने कशा प्रकारे करतात हे विविध आकृत्यांच्या साहाय्याने कुमोद आणि श्याम हे उत्साहात सर्वांना समजावून देत होते. ह्यामध्ये त्यांनी वडाच्या झाडाचे बोन्साय तसेच त्यासाठी लागणारे सर्व साहित्य सुद्धा ठेवले होते. बोन्साय ही कला आपल्या घराची शोभा कशी वाढवू शकते हे त्यामुळे सर्वांना समजले.

### ❖ सूक्ष्मजीवशास्त्र

सुक्ष्मजीवशास्त्राच्या प्रयोगांसाठी कुठल्या प्रकारचे माध्यम तसेच वेगवेगळी महागडी साहित्य उदा. लैमिनार फ्लो इ. लागतात व ती कशा प्रकारे वापरतात याचे सर्व विद्यार्थ्यांना, इतरांना सोप्या शब्दात माहीती करुन दिली सविता आणि साधना यांनी. त्यामुळे त्या शास्त्राचे स्वरुप सर्वांना समजले.

### ❖ आयुर्वेद तुमच्या घरी !

आपण घरी अनेक प्रसाधने वापरतो पण ती अनेक प्रकारच्या झाडांपासून बनवली असतात. याची सर्वांना माहिती करून दिली. संगमित्रा, गीतांजली आणि निशीगंधा यांनी. माहितीबरोबरच त्या वनस्पती कशा असतात हेही सर्वांना पहायला मिळाले.

### ❖ औषधशास्त्रात वनस्पतींचे महत्त्व

आपण सामान्य तसेच प्रमुख रोगांवर अनेक प्रकारच्या गोळ्या, औषधे वापरतो. ज्या झाडांच्या अनेक भागांतून बनवलेल्या असतात ! अशा सुमारे १२ वेगवेगळ्या वनस्पति अथवा त्यांचे काही भाग म्हणजे साल, पान इ. प्रदर्शनात दिपाली व इंदु यांनी ठेवली होती. प्रत्येक झाडापासून कोणकोणत्या प्रकारचे रोगनिवारण होऊ शकतात म्हणजेच त्यांचे औषध शास्त्रात किती महत्त्व आहे हे सर्वांना त्यामुळे समजले.

### ❖ ऑर्किडस्‌ची विविधता

प्रफुल्लने विविध प्रकारची सुंदर, रंगीत ऑर्किडस् कसे असतात हे संगणकावरील पॉवरपाईंटद्वारे सर्वाना दाखवले.

आणि आता शेवटच पण महत्त्वाचं म्हणजे विविध फुलांची पुष्परचनाची प्रदर्शनाची शोभा वाढवित होते. ह्या पुष्परचनेत जर्बेरा, कार्नेशन, ओक्सोरा, विविध रंगांची गुलाबाची फुलं तसेच अनेक प्रकारची शोभा वाढवणाऱ्या लहान वनस्पतिंची पानं सुंदर -सुंदर फुलदाणीत आकर्षकपणे मांडण्यात आली होती. पिवळ्या आणि केसरी रंगांच्या झेंडूच्या पाकळ्यांची रांगोळी पाण्यात बनवून त्यात दिवे ठेवण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येक टेबल मन उल्हासित करुन जात होतं. ह्या पुष्परचनेद्वारे सर्व मुलींनी आपली कला सादर केली असं म्हणायला हरकत नाही.

दुसऱ्या दिवशी दि. ३१ जुलै हा दिवस कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी तर होताच पण त्यादिवशी ठाण्यातील अे. के. जोशी शाळेतील दहावीच्या मुलांना आमंत्रण केले होते. त्यांनी प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर त्यांनी आणि त्यांच्या शिक्षकांनी, मुलांच्या ज्ञानात महत्त्वाची भर पडली असे सांगितले. सर्व मुलं प्रदर्शन पाहुन प्रोत्साहित झाली होती. तसेच तृतीय वर्षाच्या मुलांनी पाच-पाच ग्रुपमध्ये शाळेच्या मुलांना कॉलेजकॅम्पसमधील महत्त्वाच्या झाडांची शास्त्रीय माहिती करुन दिली. त्यामुळे त्यांना झाडांबद्दल शास्त्रीय दृष्टिकोन प्राप्त झाला.

तिसरा दिवस दि १ ऑगस्ट हा आमच्यासाठी

महत्त्वाचा होता. त्या दिवशी विद्या प्रसारक मंडळाचा ६९ वा वर्धापन दिन होता. म्हणुन वि. प्र. मंडळाचे सर्व पदाधिकारी आमच्या प्रदर्शनाला भेट देणार होते. आम्हा सर्वांचीच उत्सुकता शिगेला पोहोचली होती. अखेर दुपारी सव्वा दीड वाजता सर्व पदाधिकारी येऊन आमच्या प्रदर्शनाला भेट देवून गेले. ह्या कार्यक्रमात व्यासपीठावर डॉ. विजय बेडेकर, अध्यक्ष व इतर सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सर्व पदाधिकाऱ्यांची ओळख विभागप्रमुख डॉ. सौ. मुळगांवकर मॅडम यांनी करुन दिली. ह्या कार्यक्रमात स्वागतपर भाषण शायजी, सृष्टीची माहिती अमित तर आभारप्रदर्शन शैलजा या सर्वांनी केले. त्यानंतर सर्वांनी संपूर्ण प्रदर्शन पाहून आम्हा सर्वांचे कौतुक करुन प्रोत्साहन दिले.

आमच्या ह्या सृष्टी प्रदर्शनाची दखल 'ठाणे वार्ता' ह्या वृत्तवाहिनीने तसेच 'दै.सन्मित्र', 'लोकमत' ह्या वृत्तपत्रांत घेण्यात आली.

अशा ह्या विद्यार्थ्यांच्या क्लब चे 'सृष्टी' प्रदर्शन सफल करण्यासाठी अगदी पहिल्या सभेपासून शेवटच्या दिवसापर्यंत आम्हाला विभागाच्या प्रमुख डॉ. सौ. मुळगांवकर, डॉ. सौ. सहा, डॉ. सौ. बोरकर, डॉ. जमदाडे ह्या प्राध्यापकांचे भरपूर मार्गदर्शन लाभले. तसेच प्रयोगशाळेचे प्रमुख श्री. धारप व सहकारी श्री. सावंत, श्री. फोंडके, श्री. खापरे व श्री. बने ह्यांचे सुद्धा सहकार्य लाभले.

आमच्या ह्या महोत्सवरुपी 'सृष्टी' प्रदर्शनाला जे जे विद्यार्थी, पालक, सर्व विभागांचे प्राध्यापक तसे व्ही.पी.एम्. चे सर्व पदाधिकारी यांनी भेट देऊन आम्हाला अधिक प्रोत्साहित केले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. त्यामुळं पुढचं 'सृष्टी' प्रदर्शन ह्यापेक्षाही चांगल होईल ह्याची खात्री वाटते. त्यावेळी आपणसुद्धा भेट द्यायला विसरु नका !

अशा प्रकारे सर्वांना अनेक विषयांवर उपयुक्त माहिती ह्या 'सृष्टी' प्रदर्शनामध्ये मिळाली. मुख्य म्हणजे निसर्ग आपल्याला देतोय पण हा अनमोल ठेवा कसा जपून ठेवावा हा संदेश आमच्या छोट्याशा प्रयत्नांतून नक्कीच सफल होईल. असं मनापासून वाटतं. ह्या 'सृष्टी' बद्दलची जाणीव ठेवून आपण सर्वांनी एकतरी झाड लावून ते वाढवावं अशी आपल्याकडे नम्र विनंती.

सृष्टीच्या विविध अंगांचा विचार घोळत असतानाच मला पुढील काव्य सुचले ते असे -

*सृष्टी आहे जीवन*

*सृष्टी उल्हासित करते मन*

*सृष्टी बरसते घन,*

*सृष्टी उगवते सजीन मन,*

*सृष्टी शिकवते जगा आणि जगु द्या*

*नाहीतर विनाशाला तयार रहा*

*सृष्टीशिवाय आहे सगळ व्यर्थ*

*सृष्टी उमजवून देते जगण्यातला अर्थ*

*सृष्टीत आहेत वनस्पतिशास्त्राचे अणू-रेणू*

*म्हणुनच आम्ही प्रदर्शिला 'सृष्टी' महोत्सव जणू*

*सृष्टीचं हे देणं..*

*जपुन ठेवावं प्रत्येकानं*

*हे एकच देवाकडं मागणे*

शब्दांकन : **अमित रमेश भोईर,**
सहसचिव
(तृतीय वर्ष, वनस्पतिशास्त्र)

•••

# चला चंद्रमाधवीच्या प्रदेशात

ग्रेसच्या कवितांवरील कार्यक्रम बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या साहित्यसहकारच्या मदतीने ग्रंथाली ठाणे शाखेने केलेला कार्यक्रमाचा हा वृत्तांत - *संपादक*

''मी महाकवी दुःखाचा
प्राचीन नदीपरि खोल
दगडांचे माझ्या हाती
वेगाने होते फुल''

हृदयातील संवेदानक्षम भावनांचा अनोखा अविष्कार सांगत, सर्वांनी नाकारलेले दुःख स्विकारत अवजड काव्यप्रवास कवी ग्रेस यांच्या दुर्बोध मानल्या जाणाऱ्या कवितांचा सुबोध कार्यक्रम विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या प्रांगणात शनिवार दि. ४ सप्टेंबर २००४ रोजी संपन्न झाला.

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे, 'ग्रंथाली' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''ग्रेस' फुल युवा पिढी' हा आविष्कार रसिकांसाठी पर्वणीच ठरली.

सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी ग्रेस यांचे निकटवर्ती कविवर्य अनिल कुसुमकर, बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, तंत्रनिकेतनाचे प्राचार्य प्रो. नायक, ग्रंथालीचे दिनकर गांगल आदि मान्यवर उपस्थित होते.

मात्र हा कार्यक्रम खरा गाजला तो, तरुण कलावंतांनी ज्याच्या कल्पनेतून हा कार्यक्रम सादर झाला तो 'राहूल वैद्य' (M.C. College), रुईया महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यींनी 'मधुरा दामले, मानसी केळकर' विद्यार्थी 'नचिकेत' सतस्वती शाळेचा 'प्रशांत घाणेकर', पेटीवादक 'तन्मय फडके' आणि तबल्याची साथ देणारा 'केवल कांबळे' (सोमय्या), M.B.B.S. मध्ये २ सुवर्णपदक विजेती प्रिया सातावळकर. प्रत्येक जण विशीच्या आतला पण, या वयात त्यांनी ग्रेसच महाकाव्य पचवलं.

''येतो कोठुन पाऊस
याचा कळेना सुगावा
डोळ्यांमध्ये ढग
त्याचा असे का पुरावा''

या तलम अविष्काराचा अर्थ लावण्याची ताकद या कोवळ्या तरुणांना कोठून आली याचाच शोध घ्यावासा वाटावा, असा हा कार्यक्रम.

ग्रेसच्या कवितांचा अभ्यास करुन स्वतःच त्यावर निवेदन लिहिणाऱ्या या तरुणांनी ग्रेस दुर्बोध नव्हे हेच पटवून दिले.

''स्वच्छ कोवळे ऊन निसटले ऊन
जो जो पक्षी येतो तोही जातो उडून''

अशी क्षणभुंगुरतेची जाणीव करुन देणारी ग्रेस यांची कविता त्यांनी मांडलीच. पण त्याचबरोबर आईचा विरहही त्यांनी रिमझिमणाऱ्या पावसांत मांडला.

''ती गेली तेव्हा रिमझिम
पाऊन निनादत होता
मेघात अडकली किरणे
सुर्य सोडवित होता''

ही कविता गायनातून सादर करणारी मनाली केळकर, रसिक श्रोत्यांच्या मनातील ग्रेस विषयीचा गोंधळ गुंताच जणु सोडवत होती. तिच्या रिमिझिमणाऱ्या निवेदानातून ग्रेस यांच्या मनातील उत्कट विरह पाझरत होता.

ग्रेस यांच्या काव्याचा प्रत्येक पैलू, त्यामागचा भाव आणि निवेदनाच्या माध्यमातून स्व-मनास भावलेला ग्रेस जन-मनास भावलेला ग्रेस-जन-मनास कळविण्यास खटाटोप होता.

‘‘ तु हसलीस तेव्हा माझ्या
हृदयात मिसळली जाई
तु कुशीत होते मजला
तरीही संध्याकाळी ’’

असं म्हणतानाच ग्रेस यांच्या कविता हृदयात मिसळून रसिकांच्या मनात साहित्य सेवेचं अढळ स्थान निर्माण करण्यात हा तरुण गट यशस्वी झाला, याची आवर्जून नोंद घ्यावी लागेल.

ग्रेस म्हणजे दुर्बोधता, अवजड अवघड काव्यप्रवास अशी अनेक लेबलं ग्रेसच्या काव्याला आधीच चिकटलेली आहेत. पण, तरीही कवठात कवठ फोडून आतील गोडवा चाखवण्याचं काम या कार्यक्रमातून साकारलं.

ग्रेसच्या कविता अवघड, दुर्बोध नव्हेत, पण रुढार्थातील प्रतिमा या त्यात प्रचलित नाहीत. म्हणूनच कदाचित, ग्रेस म्हणतात, 'When you finish with others, that is my time'. चांदण्यांच्या सुखाचं प्रतिक ते तीव्र वेदनेला देतात. आणि मृत्यूच्या जाणीवेत सुर्यास्त न दाखवता ग्रेस लिहिताता,

‘‘ चर्चच्या गाभाऱ्यात
मेणबत्त्या विझताना
वाढत जातात
संगमवरी दगडांचे मनोरे’’

मृत्यू टाळण्यासाठी मर्त्य मानवाची धडपड, मृत्यूची अपरिहार्यता, कालमहिमा यांचे संवेदनाक्षम वर्णन-भारावून टाकते. या कवितांचा मोह पाडणारी पावसाची आणि निळाईची काही वैशिष्ट्येही या कार्यक्रमात उलगडून दाखविली.

ग्रेस पूर्णपणे आपणास कळले. असा मात्र या कलावंतांचा दावा नव्हता. ‘‘निमित्त’’ सारखी कविता जरासुद्धा कळली नाही. अशी प्रांजळ कबुलीही त्यांनी दिली.

कवितांच्या सदाबाहर कार्यक्रमाला कुंचल्याची साथ दिली ती ‘‘मनिष भागवत’ यांच्या कुंचल्याने. समजेल तसा ग्रेस ते कवितांतून उतरवत गेले. ज्यांना शब्दांतील ग्रेस कळले नाही, त्यांना रंगांतून ग्रेस दाखविण्याचा पराक्रम या चित्रांनी केला.

सदर कार्यक्रमास जेष्ठ कवियत्री श्रीमती उजगरे, चित्रकार ‘शांताराम राऊत’ यांची विशेष उपस्थिती होती. मटाचे राजू परुळेकर हे देखील कार्यक्रमास हजर होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी ग्रंथालीचे ८०% सवलतीत पुस्तके उपलब्ध करुन रसिक वाचकांना सुखावल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बांदोडकर महाविद्यालयाच्या ‘आर्कित वैद्य’ याने पार पाडले. आभार प्रदर्शनाचा भार ‘श्री. कुसुरकर’ यांची उचलला.

साहित्य तृषा भागवणाऱ्या या कार्यक्रमाची सांगता होताना जणू प्रत्येकाच्या मनात ग्रेस यांच्या ओळी सुर्यास्तानंतरच्या संधीप्रकाशासारख्या रेंगाळत होत्या,

‘‘बुडण्याचे निमित्त साधून
सुर्य बुडाला
बुडण्याचे निमित्त साधुन...’

**सृष्टी अंकोलेकर**
१२/३७८, एम.एच.बी. कॉलनी,
वर्तकनगर, ठाणे.

•••

**१३ ऑक्टोबर**
**विधानसभा निवडणूक**

# ठाणे जिल्ह्यात ५५ लाख ६५ हजार २०९ मतदार

ठाणे जिल्ह्यात ५५ लाख ६५ हजार २०९ मतदार असून त्यामध्ये २९ लाख ९७ हजार ४६ पुरुष आणि २५ लाख ६८ हजार १६३ स्त्री मतदारांचा समावेश आहे.

## विधानसभा मतदार संघनिहाय मतदारांची आकडेवारी पुढीलप्रमाणे

| क्र. | मतदार संघाचे नाव | पुरुष मतदार | स्त्री मतदार | एकूण | सर्व्हिस मतदार | | | एकूण मतदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरुष | स्त्री | एकूण | |
| १. | ५३-ठाणे | २,४३,७३६ | १,९६,३६२ | ४,४०,०९८ | ७१ | ३१ | १०२ | ४,४०,२०० |
| २. | ५४-बेलापूर | ६,९५,२४३ | ५,७५,००७ | १२,७०,२५० | २२५ | १०५ | ३३० | १२,७०,५८० |
| ३. | ५५-उल्हासनगर | २,१०,८१४ | १,७५,०९४ | ३,८५,९०८ | ४० | १२ | ५२ | ३,८५,९६० |
| ४. | ५६-अंबरनाथ | २,९०,२८९ | २,५१,८६२ | ५,४२,१५१ | २९ | ४ | ३३ | ५,४२,१८४ |
| ५. | ५७-कल्याण | ३,०२,३५६ | २,६५,१०१ | ५,६७,४५७ | १५२ | ६१ | २१३ | ५,६७,६७० |
| ६. | ५८-मुरबाड | १,००,०२५ | ९४,७७० | १,९४,७९५ | ५ | २ | ७ | १,९४,८०२ |
| ७. | ५९-वाडा | १,६७,२०९ | १,५०,२७१ | ३,१७,४८० | ६५ | १५ | ८० | ३,१७,५६० |
| ८. | ६०-भिवंडी | २,९२,८४७ | १,८८,९६७ | ४,८१,८१४ | ५ | ३ | ८ | ४,८१,८२२ |
| ९. | ६१-वसई | २,४७,१७७ | २,२१,६७१ | ४,६८,८४८ | १७ | ११ | २८ | ४,६८,८७६ |
| १०. | ६२-पालघर | १,०७,९९३ | १,०७,६६९ | २,१५,६६२ | १७ | १० | २७ | २,१५,६८९ |
| ११. | ६३-डहाणू | १,३४,७७८ | १,३०,४८० | २,६५,२५८ | १३ | ५ | १८ | २,६५,२७६ |
| १२. | ६४-जव्हार | १,१४,९९२ | १,२१,८२८ | २,३६,८२० | ३२ | २२ | ५४ | २,३६,८७४ |
| १३. | ६५-शहापूर | ८८,९०१ | ८८,७९९ | १,७७,७०० | १५ | १ | १६ | १,७७,७१६ |
| | एकूण | २९,९६,३६० | २५,६७,८८१ | ५५,६४,२४१ | ६८६ | २८२ | ९६८ | ५५,६५,२०९ |

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे**

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा.

संपर्क

कार्यवाह,

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.